गुरुवार, 18 ऑगस्ट 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 23
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THRUSDAY 18 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-23 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



## राजकीय पक्षांना आश्वासन देण्यापासून रोखू शकत नाही : सर्वोच्च न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राजकीय पक्षांना आश्वासन देण्यापासून न्यायालय रोखू शकत नाही, असे निरीक्षण सरन्यायाधीश व्ही. रमणा यांनी मांडले आहे. राजकीय पक्षांकडून दिल्या जाणाऱ्या मोफत गोष्टींसंबंधी डीएमके पक्षाने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश रमणा यांनी जनतेचे कल्याण हे सरकारचे कर्तव्य असल्याचे सांगितले.

जनतेचा पैसा योग्य मार्गाने खर्च करणे ही येथे मुख्य चिंता आहे. हे प्रकरण फार गुंतागुंतीचे आहे. न्यायालय या मुद्द्यांचे परीक्षण करण्यास सक्षम आहे का, असाही प्रश्न आहे, असे कोर्टाने म्हटले. डीएमकेने मंगळवारी सुप्रीम कोर्टात मोफत धोरणासंबंधी याचिका दाखल केली. जनतेच्या भल्यासाठी राज्य सरकारने आणलेल्या कल्याणकारी योजनांना मोफत दिल्या जाणाऱ्या गोष्टी असे म्हणू शकत नाही, कारण त्यामागे व्यापक हेतू असतो असा युक्तिवाद डीएमकेकडून करण्यात आला.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी, या प्रकरणावर सिब्बल आणि विकास सिंग यांनी दिलेल्या सूचना नसल्याने उद्या सुनावणी व्हावी अशी विनंती केली. याचिकाकर्ते हंसरिया यांनी यावेळी न्यायालयाने सूचना विचारात घेऊन समिती स्थापन करावी अशी मागणी केली.

डीएमके पक्षाच्या वतीने पी. विल्सन म्हणाले, आम्ही हस्तक्षेप करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. भारत एक समाजवादी कल्याणकारी राज्य आहे. येथे कल्याणकारी उपाययोजना केल्या पाहिजेत. समिती स्थापन करण्यास आमचा विरोध आहे. यावर सरन्यायाधीशांनी, तुम्हाला विरोध करण्याचा हक्क आहे, पण याचा अर्थ आम्ही आदेश देऊ शकत नाही असा नाही असे सांगितले.

# पलानीस्वामींची नियुक्ती रद्द

## पन्नीरसेल्वम यांना मद्रास हायकोर्टाचा मोठा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**चेन्नई : तामिळनाडूतील विरोधी पक्षात असलेल्या अण्णाद्रमुक पक्षातील गटबाजीच्या मुद्यावरून मद्रास हायकोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. मद्रास हायकोर्टाने ओ. पन्नीरसेल्वम यांना दिलासा दिला असून पक्षाच्या महासचिवपदावर असलेले पलानीस्वामी यांची नियुक्ती रद्द केली आहे. त्याशिवाय, अण्णाद्रमुक पक्षाने मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयावरही स्थगिती दिली आहे.**

तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री आणि अण्णाद्रमुकचे नेते ओ. पन्नीरसेल्वम यांची ई. पलानीस्वामी गटाकडून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर पलानीस्वामी यांची पक्षाच्या महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली. मद्रास हायकोर्टाने या निर्णयालाही स्थगिती दिली आहे. अण्णाद्रमुक पक्षाची बैठक ही समन्वयक आणि संयुक्त समन्वयकांनी बोलावणे गरजेचे होते. ई. पलानीस्वामी यांची या सर्वसाधारण बैठकीने महासचिवपदी नियुक्ती वैध नसल्याचे कोर्टाने म्हटले. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री जयकुमार यांनी म्हटले की, कोर्टाने अजून अंतिम आदेश दिला नाही. आम्ही याबाबत आमच्या ज्येष्ठ वकिलांसोबत चर्चा करून पुढील दिशा ठरवणार आहोत. पक्षाची जनरल कौन्सिलची बैठक अंतिम निर्णय घेणारी सर्वोच्च घटक असल्याचे त्यांनी सांगितले.

डी. जयकुमार यांनी पक्षात दुहेरी नेतृत्वाऐवजी एकच नेतृत्व असावे अशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर अण्णाद्रमुक पक्षात मोठा वाद निर्माण झाला. सध्या अण्णाद्रमुक पक्षात समन्वयक आणि सह-समन्वयक अशी पदे असून यावर ओ. पन्नीरसेल्वम आणि पलानीस्वामी यांची निवड करण्यात आली. जयकुमार यांच्या मागणीनंतर पक्षाच्या जनरल कौन्सिलची बैठक बोलावण्यात आली. या कौन्सिलच्या बैठकीत ई. पलानीस्वामी यांच्या समर्थकांची संख्या अधिक होती असे म्हटले जाते. त्यानंतर पन्नीरसेल्वम आणि पलानीस्वामी गटात वाद निर्माण झाला. या बैठकीत पलानीस्वामी यांची पक्षाच्या महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली. तर, ओ. पन्नीरसेल्वम यांचे पंख छाटण्यात आले. याविरोधात पन्नीरसेल्वम गटाने मद्रास हायकोर्टात धाव घेतली. ओ. पन्नीरसेल्वम हे अण्णाद्रमुकच्या दिवंगत जयललिता यांचे निकटवर्तीय समजले जाते. जयललिता यांना विविध गुन्ह्यात दोषी आढळल्यामुळे मुख्यमंत्रीपद सोडावे लागले होते. त्यावेळी पन्नीरसेल्वम यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची धुरा आली होती. जयललिता यांच्या निधनानंतरही पन्नीरसेल्वम यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आले होते. त्यावेळी ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले होते.

### पलानीस्वामीची पक्ष संघटनेवर पकड मजबूत?

जयललिता यांच्या निधनानंतर पक्षाची धुरा सांभाळणाऱ्या शशिकला यांनी पन्नीरसेल्वम यांना मुख्यमंत्रीपदावरून दूर केले आणि ई. पलानीस्वामी यांच्याकडे धुरा सोपवली. त्यानंतर शशीकला यांना उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती जमा केल्याप्रकरणात तुरुंगात जावे लागले होते. या दरम्यान, दोन्ही गटात दिलजमाई झाली. त्यानंतर शशिकला यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. त्यावेळी दोन्ही नेत्यांनी संयुक्त नेतृत्वावर सहमती दर्शवली होती. ई. पलानीस्वामी मुख्यमंत्री असताना त्यांनी संघटनेवरही पकड मजबूत केली. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये पक्षावरील वर्चस्वाच्या मुद्यावरून वाद सुरू आहेत.



## देवेंद्र फडणवीस राष्ट्रीय राजकारणात

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक समितीची घोषणा करण्यात आली आहे. या समितीमध्ये देवेंद्र फडणवीस यांना स्थान देण्यात आले आहे. महाराष्ट्रात भाजपचे सरकार आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या फडणवीसांवर पक्षाने महत्त्वाची जबाबदारी दिली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीसांना निवडणूक समितीत स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी फडणवीसांवर विश्वास दाखवल्याचे बोलले जात आहे. देवेंद्र फडणवीस यांना भाजपच्या संसदीय समितीत स्थान दिले जाईल अशी चर्चा होती. या समितीमधून नितीन गडकरी यांच्या रुपात महाराष्ट्रातील नेता होता. समितीची पुनर्रचना करताना गडकरींचे नाव वगळण्यात आले. त्यामुळे त्यांच्या जागी फडणवीस यांना स्थान देण्यात येईल अशी चर्चा होती. मात्र फडणवीस यांना संसदीय समितीत स्थान देण्यात आलेले नाही. देवेंद्र फडणवीस यांचा समावेश केंद्रीय निवडणूक समितीत करण्यात आला आहे. केंद्रीय निवडणूक समितीला तिकीट वाटपाचे अधिकार असताता. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा या समितीचे अध्यक्ष आहेत. पंतप्रधान मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शाह, माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा, सर्बानंद सोनोवाल यांच्यासह एकूण १५ जणांचा समितीत समावेश आहे. भारतीय जनता पक्षाच्या नव्या संसदीय समितीमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नाव वगळण्यात आले आहे. त्यामुळे आता या समितीमध्ये महाराष्ट्रातील एकही नेता नाही. या समितीमध्ये देवेंद्र फडणवीस यांना स्थान देण्यात येईल अशी चर्चा होती. मात्र त्यांच्या नावाचा समावेश निवडणूक समितीत करण्यात आला आहे.



## अजित पवारांच्या अडचणी वाढणार?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मागील अनेक दिवसांपासून राष्ट्रवादीचे बडे नेते अनिल देशमुख आणि नवाब मलिक आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी कारागृहात आहे. तर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांना देखील अटक करण्यात आली आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेसचा आणखी एक नेता लवकरच कारागृहात जाणार असल्याचा सूचक इशारा भाजप नेते मोहित कंबोज यांच्याकडून देण्यात आला होता. त्यांचा रोख अजित पवारांकडे होता. त्यातच आता अजित पवारांना मिळालेल्या क्लिनचीटबाबत मोठे वृत्त समोर आले आहे.

अजित पवारांना देण्यात आलेली क्लिनचीट अद्याप प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. अजित पवार यांना एसीबीने सिंचन घोटाळा प्रकरणी २०१९ मध्ये क्लिनचीट दिली होती. तत्कालीन आयुक्त परमबीर सिंग यांनी ही क्लिनचीट दिली होती. क्लिनचीट दिल्यानंतर नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यात अजित पवार यांना व्हीआयडीसी प्रकरणात क्लिनचीट देऊन त्यात त्यांचा रोल नाही, असे म्हटले होते. मात्र या क्लिनचीटला नागपूर खंडपीठाने स्वीकरलेले नाही. त्यामुळे अद्याप अजित पवार यांची क्लिनचीट न्यायालयात प्रलंबित आहे. दरम्यान न्यायालयाने क्लिनचीट स्वीकारली नसल्याने अजित पवार अडचणीत येण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये क्लिनचीट संदर्भात प्रतिज्ञापत्र देण्यात आले होते. मात्र ते मान्य करण्यात आलेले नाही. त्यामुळे मोहित कंबोज यांनी केलेल्या ट्वीटची चर्चा सुरू आहे. अजित पवार यांना केवळ तपास यंत्रणांनी क्लिनचीट दिली होती.

## विनायक मेटेंच्या अपघाताची सीआयडी चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाताची सीआयडी चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांना या प्रकरणाच्या तपासानंतर निष्कर्ष सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

मराठा समाजाचे नेते अशी ओळख असलेल्या विनायक मेटे यांच्या गाडीला १४ ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात झाला होता. या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने नवी मुंबईतील एम.जी.एम रुग्णालयात भेट दिली होती. मेटेंच्या मृत्यूची सखोल चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना जाहीर केले होते.

दरम्यान, याप्रकरणी मेटेंच्या गाडी चालकाची चौकशी करण्यात आली आहे. विनायक मेटेंच्या पत्नी ज्योती यांनी चालकासंदर्भात बोलताना केलेले विधान प्रकरणाचे गूढ वाढवणारे आहे. चालक अपघाताचे ठिकाण सांगत नव्हता, असे ज्योती यांनी म्हटले आहे. सत्य लपवण्याचा प्रयत्न होतो, असा आरोपही त्यांनी केला होता.

# येत्या पाच वर्षांत होणार तबब्ल ७७७ क्रिकेट सामने

## आयसीसीने जाहीर केले पुरुष क्रिकेटचे वेळापत्रक

आधुनिक केसरी न्यूज


मुंबई : आगामी पाच वर्षांमध्ये क्रिकेट चाहत्यांना मोठी पर्वणी मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आंतरराष्ट्रीय सामन्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आयसीसीने पुरुष क्रिकेटच्या पुढील टप्प्याचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. २०२१ ते २०१७ या कालावधीत १२ देशांदरम्यान तिन्ही फॉरमॅटमध्ये ७७७ आंतरराष्ट्रीय सामने खेळवले जातील. यामध्ये १७३ कसोटी, २८१ एकदिवसीय आणि ३२३ टी-२० सामने होणार आहेत. सध्याच्या टप्प्यातील सामन्यांपेक्षा पुढील टप्प्यातील सामन्यांची संख्या जास्त आहे. द्विपक्षीय मालिकांव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय क्रिकेट कॅलेंडरमध्ये मोठ्या स्पर्धांचाही समावेश करण्यात आलेला आहे. पुढील वर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकापासून याची सुरुवात होईल. त्यानंतर २०१४ मध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिका संयुक्तपणे टी २० विश्वचषकाचे आयोजिन करणार आहेत. पाकिस्तान २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करेल. तर, २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंका एकत्रित टी २० विश्वचषकाचे यजमानपद भूषवणार आहे. २०२७ मध्ये, दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे विश्वचषक आयोजित करणार आहेत.



आयसीसीच्या वेळापत्रकाचे वैशिष्ट्य म्हणजे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेतील सामन्यांची संख्या आहे. आगामी टप्प्यात दोन्ही संघ दोन कसोटी मालिका खेळणार आहेत. पण, यावेळी सामन्यांची संख्या चारवरून पाच करण्यात आली आहे. म्हणजेच दोन्ही संघ आता प्रत्येक पाच-पाच सामन्यांच्या कसोटी मालिका खेळतील. यातील एक मालिका २०२३-२४ मध्ये ऑस्ट्रेलियात होईल. तर, दुसरी मालिका २०२५-२६मध्ये भारतात होईल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळण्याची ही ३० वर्षांतील पहिलीच वेळ असेल. यापूर्वी १९९२ मध्ये दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली गेली होती. ऑस्ट्रेलिया व्यतिरिक्त भारत आणि इंग्लंडदरम्यानही पाच सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा भाग असेल. आयसीसीच्या वेळापत्रकानुसार पुढील पाच वर्षांत इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत हे देश सर्वाधिक कसोटी सामने खेळतील. यामध्ये इंग्लंड एकूण २२ सामने खेळणार आहे, तर ऑस्ट्रेलिया आणि भारत अनुक्रमे २१ आणि २० कसोटी सामने खेळणार आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# तुफानातील दीप : डॉ. टायरॉन हेज

त्यासाठी सिंजेटा कंपनीने शास्त्रज्ञ म्हणून मोठ्या पगारावर डॉ टायरॉन यांना आमंत्रित केले. डॉ टायरॉन यांनाही ही आपल्या संशोधनासाठी सुसंधी वाटली. आपले विद्यापीठातील कार्य सोडून आता डॉ टायरॉन सिंजेटा कंपनीत संशोधन करू लागले. पण हळूहळू त्यांच्या लक्षात येऊ लागले की कंपनी अट्रॅझिन नावाचे जे तणनाशक बनवत होती त्याचा विपरीत परिणाम बेडकांवर होत होता.

त्यांनी दोन प्रकारे बेडकांचे निरीक्षण केले. एका भांड्यात साधे पाणी घेऊन त्यात काही बेडूक सोडले. दुसऱ्या एका भांड्यात अट्रॅझिनयुक्त पाणी घेऊन त्यात काही बेडूक सोडले. काही दिवसांच्या निरीक्षणानंतर त्यांना आढळून आले की ज्या पाण्यात अट्रॅझिन होते, त्या पाण्यातील बेडकांच्या शरीरात काही बदल होत आहेत. अधिक प्रयोगांती त्यांना कळले की अट्रॅझिनच्या वापरामुळे नर बेडकांमध्ये मादी बेडकांसारखी लक्षणे दिसत आहेत. त्या बेडकांचे रूपांतर अशा बेडकांमध्ये झाले होते की ते ना धड नर राहिले ना धड मादी. त्यांची प्रजोत्पादनाची क्षमताच नष्ट झाली होती. आपले हे निष्कर्ष जेव्हा त्यांनी सिंजेटा कंपनीच्या अधिकारी आणि शास्त्रज्ञांसमोर मांडले तेव्हा त्यांना धक्काच बसला. कंपनी हे दुष्परिणाम मान्य करायला तयारच नव्हती. त्यांनी धूर्तपणे टायरॉन यांना आणखी प्रयोग करायला सांगितले. त्यासाठी अधिक निधी पुरवण्याचे आमिष दाखवले. टायरॉन यांनी कंपनीची खात्री पटवून देण्यासाठी आणखी संशोधन करून त्याच निष्कर्षांची पुष्टी केली. या दरम्यान कंपनीने इतर शास्त्रज्ञांना निधी पुरवून आपल्याला हवे तसे निष्कर्ष संशोधनातून काढायला लावले. सिंजेटा कंपनी अनेक विद्यापीठांनाही संशोधनासाठी निधी पुरवत होती. पैसे देऊन शास्त्रज्ञ विकत घेणे आणि आपल्याला अनुकूल असे निष्कर्ष त्यांच्याकडून काढून घेणे हे उद्योग कंपनी करत होती कारण तिला आपल्या मोठ्या उत्पन्नावर पाणी सोडायचे नव्हते.

डॉ टायरॉन यांनी कंपनीच्या इच्छेप्रमाणे काम करण्यास नकार दिला. त्यांनी कंपनी सोडली आणि लोकांना अट्रॅझिनच्या दुष्परिणामांबद्दल जागृत करण्याचे ठरवले. गावोगावी जाऊन विद्यार्थी, प्राध्यापक, शेतकरी आदींसमोर व्याख्याने दिली. यामुळे महाबलाढ्य सिंजेटा कंपनी हादरली. तिने साम, दाम, दंड, भेद या सगळ्या नीती डॉ टायरॉन यांच्या विरुद्ध वापरल्या पण टायरॉन बधले नाहीत. त्यांनी आपले जागृतीचे आणि संशोधनाचे कार्य सुरूच ठेवले. त्यांचे बेडकांवरील संशोधन जगप्रसिद्ध ' नेचर ' या मासिकात प्रकाशित होऊन जगभर पोहोचले. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक

आधुनिक केसरी

आपण नेहमीच शारीरिकदृष्ट्या स्वतःचा विचार करत असतो. अगदी अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजा आपण केवळ शरीरासाठीच पूर्ण करत असतो, त्यासाठी अर्थार्जनाची जरुरी असते. त्यामुळे दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून आपण ते मिळविण्यासाठी धडपडत असतो. पण मनाचा विचार खरंच आपण करतो का हो ? जरूर करतो, पण जसा आणि जितका मनाचा विचार आपल्याकडून व्हायला पाहिजे तितका होत नाही, हेही तितकेच खरं आहे. कदाचित मनाच्या विचाराकडे आपण गांभीर्याने पाहत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याच मनाचा मनातल्या मनांत, मनमुरादपणे, मनपसंद अथवा मन मारूनही आपण विचार करत नाही. कदाचित, शरीर दृश्य आहे, म्हणून त्याचा विचार आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने करतो; मन मात्र अदृश्य असते त्यामुळेच त्याच्याकडे अनावधानाने दुर्लक्ष होत असते. मनाचा आणि शरीराचा मिलाफ झालेला असतो, किंबहुना तो असावा लागतो. आपले विचार मनांत प्रसूत होत असतात, त्यानुषंगाने आपण वर्तन करत असतो आणि ह्या दोन्हींच्या माध्यमातून आपले व्यवहार होत जातात. ह्याठिकाणी व्यवहार केवळ आर्थिकच नाही, तर दैनंदिन व्यवहार देखील आपल्या विचार आणि वर्तनावर अवलंबून असतात. खरं तर शरीर मनाच्या ताब्यात असते. शरीर आणि शारीरिक हालचाली मनच नियंत्रित करत असते. असं असूनही आपण मनाचा फारसा विचार करत नाहीत. आपल्या मनाचा ब्रेक कधी, कोठे, कसा लावायचा ह्याचे केवळ ज्ञान असून चालणार नाही तर मनाला ब्रेक लावायचे भानही ठेवायला हवे.



आधुनिक केसरी

## सत्कर्माचे फळ | मोक्ष देई ||

कोणाच्या धनाचा | कोण रे मालक ||
सत्तेचा चालक | विश्वंभर ||१||

भाड्याचे हे घर | विसर पडला ||
विषयी ग्रासला | उभा जन्म ||२||

उधारीचे श्वास | सत्कर्म किराया ||
परी मोह-माया | मेळ नाही ||३||

जप्ती येते घरा | वाढता उधारी ||
श्वास हा माघारी | काळ नेतो ||४||

सावध हो वेड्या | घाल ताळमेळ ||
सत्कर्माचे फळ | मोक्ष देई ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

**अङ्गं हरेःपुलकभूषणमाश्रयन्ती**
**भृङ्गाङ्गनेवमुकुलाभरणं तमालम् ।**
**अङ्गीकृताखिलविभूतिरपाङ्गलीला**
**माङ्गल्यदास्तु ममगङ्गलदेवतायाः ॥१॥**

जसे भ्रमरी अर्धोन्मीलित पुष्पांनी अलंकृत तमाल वृक्षाचा आश्रय घेते, त्याप्रमाणे श्रीहरीच्या रोमांचांनी सुशोभित श्रीअंगांचे ठायी नित्य निवास करणाऱ्या जिचे ठायी संपूर्ण ऐश्वर्याचा निवास आहे, अशी संपूर्ण मंगलांची अधिष्ठात्री देवी भगवतीची कटाक्षलीला माझ्यासाठी शुभदायिनी होवो.||१||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## श्री समर्थ रामदास स्वामी शिष्य कल्याण स्वामी कथा

# डाळगप्पू

आधुनिक केसरी

सज्जनगडावर जी तळी आहेत त्यांना जिवंत पाण्याचे झरे नाहीत. पावसाळ्यात साठलेले पाणी वर्षभर वापरावे लागते.अशा पाण्यामुळे कफ वाढू शकतो.गडावर येण्यापूर्वी समर्थांना कफाची व्यथा होतीच.वैद्याने जिवंत पाणी वापरण्याचा सल्ला दिला. सज्जनगडापासून सर्वात जवळचे जिवंत पाण्याचे स्थान म्हणजे उरमोडी नदी.गडाच्या पायथ्याला असलेल्या परळी गावापासून ही नदी अडीच कि.मी.अंतरावर आहे.समर्थां साठी रोज दोन हंडे पाणी आणण्याची जबाबदारी कल्याणस्वामींनी स्विकारली. गुरु सेवेची उत्तम संधी मिळाल्याने त्यांना आनंद झाला.दोन भले मोठे हंडे घेऊन कल्याण उरमोडी नदीवर जाऊ लागले.व येताना भरलेल्या हंड्याची कावड करुन रोज पाणी आणू लागले.एक दिवस समर्थ गडाच्या तटावर उभे राहून किल्याचे निरीक्षण करीत आसता कल्याणस्वामींना पाणी आणतांना त्यांनी पाहीले.कल्याणाच्या अंगाला घामाच्या धारा लागल्या होत्या.भुकेने व उन्हाने चेहरा काळवंडलेला होता.कल्याणाची काहींतरी न्याहरीची व्यवस्थाकेली तरच त्याची प्रकृती उत्तम राहील असा विचार करुन समर्थ कोठीवाल्याकडे गेले व त्यांनी कोठीवाल्याला कल्याणांना रोज सकाळी दोन शेर हरभऱ्याची डाळ,अर्धा शेर गुळ व पावशेर साजूक तूप देण्यास सांगितले.त्यानंतर त्यांनी कल्याणाला बोलावून घेतले व प्रकृती उत्तम रहाण्यासाठी दिलेला शिधा न्याहारीसाठी वापरण्यास सांगितले. दुसऱ्या दिवसापासून कल्याणस्वामींना रोज शिधा सुरु झाला.त्या मुळे बाकीच्या शिष्यांच्या पोटात दुखू लागले.माणसाने स्वतः जास्त खाल्ले तर त्याचे पोट दुखतेच,पण दुसऱ्याला भरपूर खायला मिळालेले पाहून त्याचे पोट दुखू शकते. कल्याणांना जास्तीचा शिधा मंजूर झाला म्हणून सारे जण त्यांना डाळगप्पू असे म्हणू लागले.खरतर त्यांच्या तोंडावर बोलायची कोणाचीच ताकद नव्हती.

"आता हा डाळगप्पूच पहा !" केवळ ढोर मेहनत आहे.भरमसाठ खायच आणि गुरासारख राबायचं,कधी जप करणे नाही,दासबोध वाचन नाही,अशा दिनचर्येने त्याच कधीही सार्थक होणार नाही."ही शिष्यांची चर्चा समर्थांच्या कानावर गेली.एक दिवस सायंकाळी मठाच्या अंगणात शिष्यांशी गप्पा मारता मारता समर्थ म्हणाले "तुमच्या पैकी दासबोधाची सर्वात जास्त पारायणे कोणी केली आहेत.?"सगळे शिष्य एकाच वेळी गलका करुन आपली पारायणसंख्या सांगू लागले.यात एकावन्न पासून अकराशे पारायणे पूर्ण करणाऱ्या शिष्यापर्यंतचा सर्वांचा समावेश त्यात होता.

"ऐसा सद्गुरु पूर्णपणी"पहिला चरण असलेली ओवी मला संपूर्ण आठवत नाही,तेव्हा ती ओवी कोण सांगू शकेल ?" सारे शिष्य गडबडले. अगदी अकराशे पारायणे झालेल्यासुध्दा लज्जायमान होऊन गप्प बसला. तेवढ्यात समर्थांनी कल्याणास हाक मारली व तीच ओवी विचारली तेव्हा कल्याण तात्काळ म्हणाले "स्वामीजी,ऐसा सद्गुरु पूर्णपणी ! तुटे भेदाची कडसणी ! देहाविण लोटांगणे ! तया सद्गुरुसी !!" ही ओवी सातव्या दशकातील पहिल्या समासात अठरावी आहे." कल्याण चुकला असेल म्हणून शिष्यांनी दासबोध काढून,पाहीला संपूर्ण बरोबर होती. समर्थांनी विचारले "कल्याणा,तुझी किती हजार पारायणे झाली." हात जोडून कल्याण म्हणाले "स्वामीजी, आपल्या कृपेने एकच पारायण मनापासून घडले." बरं ते जाऊ दे अलिकडे डाळगप्पू नावाचा कुणी साधक आला आहे काय ? हा डाळगप्पू कोण ? कल्याण म्हणाले "स्वामीजी ,जीव,शीव,माया,ब्रह्म,सुख-दुःख ही दोन दळं जो गप्प करुन टाकतो सदैव अद्वैत बोधात राहतो तो डाळगप्पू होय.मात्र ही व्यक्ति माझ्या पाहण्यात आली नाही."

कल्याणस्वामींच्या या उत्तराने सारे शिष्य खजील झाले.आपली चूक त्यांच्या लक्षांत आली,नंतर समर्थांनी अगदी खरमरीत शब्दांत सर्वांची हजेरी घेतली.व सर्व शिष्यांना सांगितले "उगीच नुसती पारायणे करु नका. दासबोध हे तंत्र आहे त्याचा मंत्र बनवू नका.शांतपणे वाचून अर्थ समजून घ्या.दासबोध जगायला शिका.कोणाची निंदा नालस्ती द्वेष करु नका."

# समर्थ रामदास स्वामी स्थापित प्रसिद्ध अकरा मारुती

आधुनिक केसरी

सहा दगडी खांब्यावर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप 13 फूट लांबी रुंदीचा आहे.

**शिराळ्याचा मारुती :** सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव शिराळे याचा एसटी स्टॅन्डजवळ हे मारुतीचे देऊळ समर्थानी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीची मूर्ती अतिशय भव्य आहे. 7 फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनवलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्यामध्ये घंटा बसविण्यात आला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजवी आणि डाव्या बाजूस झरोके आहे ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्राकाराला दक्षिण दिशेस दार आहे.

**शहापूरच्या मारुती :** कराड मसूर रस्त्यावर 15 की.मी. च्या अंतरावर मसूरपासून 3 की.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून 1 की.मी. लांब हे मारुतीचे देऊळ आहे. 11 मारुती मधल्या मारुतीमध्ये सर्वात पहिले या मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला चुन्याचा मारुती देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकांवर नदीच्या काठाला मारुतीचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. 7 फुटाची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून 2 दगडी रांजण दिसतात ह्याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असतं.

**बहे बोरगावचा मारुती :** सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावा जवळ बोरगांवामुळे त्याला बेह बोरगाव म्हटले जाते. इथल्या मारुतीच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतांना इथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णानदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतं तेव्हा मारुतीने आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले. आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले. या जागी मारुतीचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात डोक्यावर मुकुट हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. इथे जाण्यासाठी कृष्णानदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास इथे जाणे शक्य नसते.

**मनपाडळेचा मारुती :** मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड -ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे 14 की.मी.च्या अंतरावर हे मनपाडळे आहे. 11 मारुती पैकी सर्वात दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुती देऊळाची स्थापना समर्थानी केली 5 फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्ती जवळ दीडफुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.

**पाडळी मारुती :** वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाच्या जवळच पाडळी गावात मारुतीची मूर्ती आहे.

**पारगावाचा मारुती :** यालाच बाळमारुती किंवा समर्थांच्या झोळीतला मारुती असे म्हणतात. कराड- कोल्हापूर रस्त्यावर वाठार गाव जवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीची मूर्ती आहे. 11 मारुतींपैकी शेवटची आणि सर्वात लहान अशी ही मूर्ती सपाट दगडवर कोरलेली दीड फुटीची मूर्ती आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर 5 की.मी.चे असून वळसा घेलेला रस्ता आहे.

या 11 मारुती शिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमयाचा मारुतीचे स्थापन केले आहे. एकदा तरी आपण 11 मारुतीच्या दर्शन करावे.

# ओरिऑन सिटीकेअर हॉस्पिटल व मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. पांडुरंग वट्टमवार यांना वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायझेशनतर्फे डायमंड पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील ओरिऑन सिटीकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व प्रसिध्द मेंदुविकारतज्या डॉ. पांडुरंग वट्टमवार यांना वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायजेशनतर्फे डायमंड पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. डॉ. वट्टमवार हे औरंगाबादेतील ओरिऑन सिटीकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल येथील मेंदुविकार विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

पक्षाघाताच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी नवनवीन पद्धती आणि शैलींचा अवलंब करणाऱ्या डॉक्टरांना संघटनेतर्फे हा पुरस्कार दिला जातो. पक्षाघात हे जगभरातील मृत्यू आणि अपंगत्वाच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण आहे. या आजारात केवळ रुग्णांवर नव्हे तर संपूर्ण कुटुंबावर परिणाम होतो. काळाबरोबर आता उपचारांमध्ये झालेली प्रगती आणि अद्ययावत तंत्र यांमुळे रुग्णांचा बरे होण्याचा दर्जा उंचावला आहे. ओरिऑन सिटीकेअर हॉस्पिटलमधील मेंदूरोग विभाग पक्षाघाताच्या रुग्णांना तातडीने अद्ययावत उपचार देण्याकडे आणि बरे झाल्यानंतर त्यांना चांगले जीवनमान देण्याबाबत नेहमीच प्रयत्नशील असते. हा पुरस्कार ओरिऑन सिटीकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व डॉ. पांडुरंग वट्टमवार यांना मराठवाड्यातील एकमेव उत्तम मेंदूरोगविभाग व मेंदूरोगतज्ञ म्हणुन सन्मानित केले आहे. जागतिक स्ट्रोक ऑर्गनायझेशनकडून ब्रेन स्ट्रोक मॅनेजमेंटसाठी डायमंड पुरस्काराचा दर्जा मिळणे ही अत्यंत सन्मानाची बाब आहे. हे यश ओरिऑन सिटीकेअर हॉस्पिटलसाठी तसेच मराठवाड्यासाठी मोलाची बाब ठरली आहे. डॉ. पांडुरंग वट्टमवार रुग्णांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी अथक प्रयत्नशील असतात. सदरील डायमंड पुरस्कार हा डॉ. वट्टमवार यांच्या सातत्यपूर्ण व आधुनिक कौशल्यांच्या दर्जामुळेच प्राप्त होऊ शकला आहे. डॉ. पांडुरंग वट्टमवार स्ट्रोकचे परिणाम सुधारण्यासाठी वचनबध्द आहे. पक्षाघाताचे सर्वसमावेशक व्यवस्थापन डॉ. वट्टमवार यांच्या मार्गदर्शनाखाली ओरिऑन सिटीकेअर हॉस्पिटल येथे मेंदूरोगविभागात होते. समाजातील पक्षाघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रतिबंध उपचार आणि जागृकता यामध्ये सतत सुधारणा करण्याचे ध्येय डॉ. वट्टमवार यांचे आहे. डॉ. पांडुरंग वट्टमवार यांच्या न्युरोविभागाच्या या अत्याधुनिक सुविधांमुळे पक्षाघातांच्या रुग्णांसाठी ओरिऑन सिटीकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल हे मराठवाड्यातील सर्वोत्तम रुग्णालयांपैकी एक ठरले आहे.




पक्षाघातामध्ये Save Minute Save Life प्रत्येक क्षण हा महत्वाचा असतो ज्यामध्ये आपण कित्येक रुग्णांचे आयुष्य वाचवु शकतो. एखाद्या व्यक्तिला पक्षाघाताचा ॲटक आला तर मेंदूला रक्तपुरवठा कमी पडतो. मेंदूला रक्तपुरवठा कमी पडल्यानंतर प्रत्येक क्षणाला मेंदूच्या लाखो पेशी मृत होत असतात. अश्या वेळेस प्रत्येक क्षण खुप महत्त्वाचा असतो. म्हणून पक्षाघाताची लक्षणे आढळताच त्वरीत उपचार करणे, किती गरजेचे असते याबद्दल जागृकता करून पक्षाघाताचा झटका आलेल्या रुग्णांसाठी ओरिऑन सिटीकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलने नुकताच ब्रेन स्ट्रोकच्या आपत्कालीन परिस्थितीसाठी २४ तास तत्पर हेल्पलाईन ACUTE STROKE HELPLINE NO-18005999100 क्रमांकाचे अनावरण केले आहे.

जेव्हा एखाद्या व्यक्तिला स्ट्रोकचा झटका येतो तेव्हा नातेवाईकांनी दिलेल्या हेल्पलाइन नंबर वर तात्काळ फोन केला असता.. नातेवाईकाला योग्य ते मार्गदर्शन करून रुग्णाला प्राथमिक उपचार ( रक्ताच्या गुठळ्या विरघळण्यासाठीचे इंजेक्शन दिले जाते कारण स्ट्रोक हा २-३ तासानंतर अति तिव्र स्वरूपाचा होतो.) देवुन नजीकच्या मेंदूरोग विभागात रुग्ण लवकरात लवकर कसा पोहोचेल याची संपूर्ण व्यवस्था या उपक्रमातुन केली जाईल. ही संकल्पना म्हणजे आयुष्य वाचविणेच नव्हे तर जीवनाची गुणवत्ता वाढविणे आहे.

# मोहनलालजी बियाणी स्मृतीप्रित्यर्थ मासिक व्याख्यानमालेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने दै. मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मासिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार दि.१९ ऑगस्ट रोजी औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात दुपारी ३.३० ते ५ दरम्यान ऑनलाइन पत्रकारितेसमोरील आव्हाने याविषयावरील पहिले पुष्प न्यूजटाऊनचे संपादक सुरेश पाटील हे गुंफणार आहेत.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार यावर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराष्ट्रात विविध ठिकाणी वर्षभर दरमहिन्याला विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

# खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते २० ऑगस्ट रोजी नारद पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण

## विजय बाविस्कर, अभिजित अत्रे आणि वैशाली बालाजीवाले यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्काराचे वितरण शनिवार, दि.२० ऑगस्टला सकाळी ११ वाजता होणार आहे. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते, खासदार डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये एका विशेष समारंभात पुरस्कार वितरण होणार असल्याची माहिती विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे मिलिंद कांबळे आदी उपस्थित होते.



या पुरस्कार उपक्रमाचे हे ११वे वर्ष असून देवर्षी नारद जयंतीच्या निमित्ताने हे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या चार पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. कोरोना महामारीमुळे गेली २ वर्षे हा पुरस्कार कार्यक्रम न झाल्यामुळे २०२०, २०२१ आणि २०२२ या तीन वर्षांचे पुरस्कार एकत्र देण्यात येणार आहेत. या प्रत्येक वर्षासाठी ज्येष्ठ पत्रकार, आश्वासक पत्रकार, छायाचित्रकार/व्यंगचित्रकार आणि सोशल मीडिया या वर्गातून पुरस्कार देण्यात येणार आहेत. पुरस्काराचे स्वरूप ज्येष्ठ पत्रकार यांना २१ हजार रुपये तर अन्य तीन पुरस्कार ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे राहील.

ज्येष्ठ पत्रकार पुरस्काराच्या मानकऱ्यांमध्ये 'लोकमत'चे समूह संपादक विजय बाविस्कर, 'टाईम्स ऑफ इंडिया' पुण्याचे उप निवासी संपादक अभिजित अत्रे आणि नाशिक येथील दैनिक 'देशदूत'च्या संपादक वैशाली बालाजीवाले यांचा समावेश आहे. 'केसरी'च्या कोल्हापूर ब्यूरो चीफ अश्विनी टेंबे, 'महाराष्ट्र टाईम्स' पिंपरी-चिंचवडचे विशेष प्रतिनिधी सुनील लांडगे आणि 'सकाळ' पुणेच्या कार्यकारी संपादक शीतल पवार यांची आश्वासक पत्रकार पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सांगलीचे आदित्य वेल्हाळ आणि पुण्यातील 'टाईम्स नाऊ वाहिनी'चे व्हिडियो जर्नलिस्ट रूख्मांगद पोतदार यांना छायाचित्रकार तसेच पुण्याचे घनश्याम देशमुख यांना व्यंगचित्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सोशल मीडिया पुरस्कारांसाठी नाशिक येथील द 'फोकस इंडिया'चे संपादक विनायक ढेरे, पुण्यातील अमित परांजपे आणि सांगली येथील विनीता तेलंग या सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसरची निवड झाली आहे.

यापूर्वी हे पुरस्कार 'ए बी पी माझा'चे संपादक राजीव खांडेकर, 'झी२४ तास'चे डॉ. उदय निरगुडकर, 'तरुण भारत' बेळगावचे संपादक किरण ठाकूर, 'दिव्य मराठी'चे संपादक प्रशांत दीक्षित, 'महाराष्ट्र टाईम्स'चे संपादक पराग करंदीकर, 'लोकसत्ता' पुण्याचे निवासी संपादक मुकुंद संगोराम, ज्येष्ठ पत्रकार कै. दिलीप धारूरकर, ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर व 'आज का आनंद'चे संपादक श्याम अग्रवाल आदींना पुरस्कार देण्यात आले आहेत.

हा कार्यक्रम शनिवार २० ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११ वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फीथिएटरमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिषद व नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे उपस्थित राहणार आहेत. या समारंभास माध्यम क्षेत्रातील पत्रकार व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विश्व संवाद केंद्र व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रीय विचारांनी प्रेरित विश्व संवाद केंद्राचे देशभर कार्य असून विविध राज्यातून ३० केंद्र कार्यरत आहेत. पुण्यातील केंद्राची स्थापना २०१४ झाली असून पश्चिम महाराष्ट्र हे केंद्राचे कार्यक्षेत्र आहे. विश्व संवाद केंद्र राष्ट्रीय विचारांच्या प्रसार-प्रचाराचे कार्य करते. त्यासाठी केंद्रातर्फे माध्यमांशी माहितीची देवाणघेवाण करून समन्वय ठेवला जातो.

# '५० खोकेवाले आले' घोषणा मुख्यमंत्र्यांच्या जिव्हारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जोरदार फॉर्ममध्ये असणाऱ्या विरोधकांनी अधिवेशाच्या पहिल्याच दिवशी आज सत्ताधाऱ्यांना पुढील पाच दिवसांत आपण काय करणार आहोत, याबद्दलचे इरादे स्पष्ट करुन सांगितले. कामकाज सुरु होण्याच्या तासभर अगोदरच विरोधकांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर प्रचंड घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी शिंदे गटाच्या आमदारांचं विधिमंडळ परिसरात आगमन होताच, आले रे आले गद्दार आले... ५० खोकेवाले आले... अशा शब्दांत आदित्य ठाकरेंसह विरोधकांनी जोरदार घोषणा देत शिंदे गटाला हिणवले. आदित्य ठाकरेंचे शब्द आणि हिणवण्याची भाषा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जिव्हारी लागली आहे. या साऱ्या प्रकारानंतर विरोधकांना जशास तसे उत्तर द्या, असे आदेशच मुख्यमंत्र्यांनी आपल्या आमदारांना दिले आहेत.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांचा आक्रमक पवित्रा पाहायला मिळाला. सत्तेत येताच आमदारांची दादागिरीची वक्तव्ये, अतिवृष्टी काळात शेतकऱ्यांना न झालेली मदत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अशा मुद्द्यांवरुन विरोधी पक्षाने सत्ताधाऱ्यांविरोधात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. सभागृहात पहिल्या दिवशी फारशी खडाजंगी झालेली नसली तरी सभागृहाबाहेर विरोधकांचा आक्रमक पवित्रा पाहायला मिळाला. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे तसेच त्यांच्या गटातील आमदारांचे विधिमंडळ परिसरात आगमन झाले. याचवेळी विरोधकांनी विधिमंडळ परिसर घोषणांनी दणाणून सोडला होता. शिंदे गटातील आमदारांना पाहताच विरोधकांच्या गर्दी उभे असलेल्या आदित्य ठाकरे



यांच्यासहित बाकी आमदारांनी "आले रे आले गद्दार आले..." अशा घोषणा दिल्या. यावेळी ५० खोके.. सगळं ओके.... अशा घोषणाही दिल्या गेल्या.

विरोधकांची हीच घोषणाबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जिव्हारी लागली. विधिमंडळाचे कामकाज संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी आपल्या आमदारांशी खाजगीत बोलताना विरोधकांना जशास तसे उत्तर देण्याची सूचना केली. विरोधकांच्या आरोपांना प्रत्युत्तरे द्या, अजिबात शांत बसू नका. आपले सरकार कसे चांगले काम करते आहे, हे लोकांना पटवून सांगा, असे आदेश देतानाच आपण लोकप्रतिनिधी आहोत, त्यामुळे आपले वर्तन व्यवस्थित असले पाहिजे. एखादी गोष्ट समजावून सांगताना ती लोकशाही मूल्ये आणि संविधानिक भाषेत समजावून सांगावी. आपल्याकडून कोणतंही चुकीचं वर्तन होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही एकनाथ शिंदे यांनी आपल्या गटातील आमदारांना दिला.



# काँग्रेसला मोठा धक्का!

आधुनिक केसरी

काँग्रेस नेते गुलाम नबी आझाद यांनी पक्षाला मोठा धक्का दिला आहे. गुलाम नबी आझाद यांनी पक्षाने जम्मू काश्मीरच्या प्रचार समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती केल्यानंतर काही तासातच राजीनामा दिला आहे. इंडिया टुडेने सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, प्रकृतीच्या कारणास्तव गुलाम नबी आझाद यांनी नवी जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिला आहे. दरम्यान पक्षावर गेल्या काही काळापासून नाराज असलेले गुलाम नबी आझाद पक्षाविरोधात बंड पुकारण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. काँग्रेस पक्षाने प्रचार समिती तयार केली होती. यामध्ये ११ नेत्यांचा समावेश करण्यात आला होता. प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष या समितीचे स्थायी सदस्य होतेय. तारिक हमीद कारा यांची प्रचार समितीचे उपाध्यक्ष तर जीएम सरुरी यांची निमंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. गुलाम नबी आझाद आधीच पक्षाच्या अखिल भारतीय राजकीय घडामोडी समितीचे सदस्य असल्याने यावर त्यांचा आक्षेप आहे. गुलाम नबी आझाद पक्षाचे दिग्गज नेते असून माजी मुख्यमंत्रीदेखील आहेत. त्यांनी केंद्रीय मंत्री म्हणून काम केले असून, पक्षाची अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. पक्षात संघटनात्मक बदल व्हावेत यासाठी पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधींना पत्र लिहिणाऱ्या २३ नेत्यांमध्ये त्यांचाही समावेश होता. आपले जवळचे सहकारी गुलाम अहमद मीर पक्षाच्या जम्मू काश्मीर विभागाच्या प्रमुखपदावरुन बाजूली झाल्यानंतर काही तासातच गुलाम नबी आझाद यांनीदेखील पद सोडले. गेल्या महिन्यात गुलाम अहमद मीर पायउतार झाले होते. पक्षाने संघटनात्मक फेरफार केले असून मीर यांच्या जागी विकार रसूल वाणी यांची नियुक्ती केली आहे.

# धर्माच्या उतरंडीचा बळी : इंदर



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाली तरीही मनुच्या विचारातली जातीय उतरंड निखळून पडत नाही. हे या देशाचे दुर्भाग्य आहे. ज्या लेकरांना जात, धर्म, वंश, परंपरा काहीच समजत नाही. पोटाला लागलेली पाण्याची तहान भागवण्यासाठी मटक्याच्या भांड्याला केलेला स्पर्श आणि त्याची प्रचिती म्हणजे त्याचा मृत्यू ही काळीमा फासणारी घटना कशी धुवायची! हा मोठा प्रश्न आता समाजासमोर उभा आहे.**

घर सोडतो, दार सोडतो, माहित नसणाऱ्या चार भिंतीमध्ये प्रवेश घेतो. आई वडील नेहून सोडतात. म्हणून भीत का होईना, रडत का होईना, त्या शाळेच्या पायऱ्या चढत असतो. रोजच्या सवयीमुळे हळूहळू त्याच भिंतीमध्ये रुळत असतो. नव्या युगाचा साक्षीदार म्हणून हळूहळू शिकत असतो. आणि पहिली प्रार्थना म्हणतो.
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा
गुरुदेव साक्षात परब्रम्ह
तस्मै श्री गुरुवे नमः
हे विश्वाच्या निर्मात्या तुला मी प्रथम वंदन करतो.
आईच्या नंतर विश्वास ठेवून जीवनाची वाटचाल करायला लावणारा वंदनीय असा तो शिक्षक असतो. समाज बदलाचं प्रेरणास्त्रोत असा तो शिक्षक. आईच्या नंतर आई इतकं प्रेम देणारा असा तो शिक्षक असतो. विचार प्रदान करणारा, आचार प्रदान करणारा, माणूस बनण्याचं मंदिर शिक्षक असतो. कुटुंब वत्सल, देशप्रेम शिकवीणारा, शिक्षक असतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची माहिती देणारा शिक्षक असतो. आदर्श नागरिक बनवीण्याचं मुख्य केंद्र म्हणजे शिक्षक. देशाला प्रगतीपथावरती घेऊन जान्याचा विचार देणारे, ऊर्जा देणारे,मुख्य स्त्रोत म्हणजे शिक्षक. खरंच शिक्षकांमध्ये सर्वच सामावलेले असते. ते तत्त्वज्ञान, तो विचार, हा शिक्षकांच्याकडून मुलांच्या कडे जातो. आणि देशाचं भवितव्य घडवीणारी नवी पिढी निर्माण होत असते. त्या शिक्षकाची, तशा शिक्षकाची समाजाला अत्यंत गरज असते. शिक्षकाला जात नसावी. शिक्षकाला धर्म नसावा. असा तो आदर्श शिक्षक या मातीत निर्माण व्हायला हवा. सध्याचं वास्तव जरा कठीण आहे. आताची वास्तविकता पाहिल्यास ते शिक्षक कुठल्या ना कुठल्या



संघटनेशी जोडलेले आहेत. जातीयवाद निर्माण करणाऱ्या, धर्मवाद निर्माण करणाऱ्या, विविध ग्रुपचे ते पदाधिकारी असणारे शिक्षक निर्माण झालेले आहेत. मटका गुटका जुगार आणि दारूच्या अड्यावरी फिरणारे शिक्षक आता मोठ्या प्रमाणामध्ये दिसत आहेत. ड्युटी हा धर्म मानून पुस्तकात लिहिलेलं तेवढंच शिकवणारा शिक्षक, आज दिसतो आहे. दहा ते पाच ड्युटी यापलीकडचं कुठलंही तत्त्वज्ञान देणारा, मुलांसोबत रमणारा, मुलांच्या घरापर्यंत जाणारा, मुलांचे सुखदुःख पाहणारा, मुलांच्या अडचणी पाहणारा, शिक्षक उरलेला दिसत नाही. ही या देशाची शोकांतिका आहे.
आम्ही साने गुरुजींचे पुस्तक वाचून दाखवतो. मात्र साने गुरुजींच्या जीवनातला कुठलाही भाग आम्ही स्वतः अंगीकारत नाही.आणि दुसऱ्यांनाही शिकवत नाही.
आम्ही नीतिमूल्य तत्त्वज्ञान हे .मुलांना शिकवतो. परंतु स्वतः अंगीकारत नाहीत. म्हणून देशांमध्ये अशा विघातक घटना घडत आसतात. म्हणून विचाराची राख रांगोळी होऊन जाते.
स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाली तरीही मनुच्या विचारातली जातीय उतरंड निखळून पडत नाही. हे या देशाचे दुर्भाग्य आहे.
ज्या लेकरांना जात, धर्म, वंश, परंपरा काहीच समजत नाही. पोटाला लागलेली पाण्याची तहान भागवण्यासाठी मटक्याच्या भांड्याला केलेला स्पर्श आणि त्याची प्रचिती म्हणजे त्याचा मृत्यू ही काळीमा फासणारी घटना कशी धुवायची!!!!हा मोठा प्रश्न आता समाजासमोर उभा आहे.
आदर्श शिक्षक कसा असावा याचे तत्वज्ञान देण्यासाठी आम्ही कमी पडलोत का? शिक्षक ही लेकराची दुसरी आई असते हा विचार आम्ही शिक्षकांना देऊ शकलो नाही का? आम्ही कुठे कमी पडलोत? राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम हे मूल्यशिक्षण देण्यासाठी आम्ही कमी पडलोत का? कुठे चुकलो! याचा शोध घेण्याची नक्की गरज आहे.
इंदर तुला श्रद्धांजली, आदरांजली तरी कुठल्या तोंडाने, हातानी वहायची रे बाळा! स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एका बाजूला साजरा करतो आहोत आणि दुसऱ्या बाजूला मनुस्मृतीतल्या विचारधारेवरती तुझा बळी घेतला जातो. कुठल्या तोंडाने कुठल्या विचाराने तुला आदरांजली वहायची ते तरी सांगून जायला हवं होतं रे.!
इंदर खरं सांगू तुला शिक्षक हा आई असतो. तो गुरु असतो. तो भ्रम्हा असतो. विश्वाचा निर्माता असतो. म्हणून तू तुझ्या हातातलं बळ त्या शिक्षकाला दाखवलं नाहीस. तुलाही हे करता आलं असतं. परंतु तू तुझा धर्म पाळलास ते तू केले नाहीस. तू सहन केलस कारण तुला शिक्षकांमध्ये आई दिसली असेल. ईश्वर दिसला असेल. म्हणून हतबल होऊन तू ते सहन केलं. तू दाखवलेल्या तुझ्या धर्माबद्दल, सहनशीलते बद्दल मी नतमस्तक होतो.

# कृष्णाला मग राधा होऊन पूजतो श्रावण



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**श्रावणात प्रत्येक वाराला म्हणजे दिवशी एकेका दैवताचे पूजन केले जाते. जसे सोमवारी महादेवाचे, मंगळवारी मंगळागौर आणि भवानी मातेचे बुधवारी विठ्ठलाचे गुरुवारी दत्तात्रेयाचे असे सर्वच दिवशी प्रत्येक देवाचे पूजन हा श्रावण आपल्या सरींतून करत असतो. या भक्तीमध्ये या श्रावणसरी भिजून चिंब झाल्या आहेत. प्रत्येक देवतेवर त्या अभिषेक करीत आहेत. त्या मनमुराद भक्तिमय झाल्या आहेत. जन्माष्टमी असल्याने गझलकाराला वाटते की, हा श्रावण स्वतः राधा होऊन कृष्णाचे पूजन करीत आहे.**

श्रावण महिना म्हणजे सणासुदींचा महिना. महिलांसाठी श्रावण म्हणजे माहेरसरच जणू म्हणजे जशी पावसाची सर तशी श्रावणाची सर. कवींनी श्रावणाला साद घातली आहेच. परंतु गझलकारांनादेखील श्रावणाला गझलेत आणि शेरात गुंफण्याचा मोह होतोच की. श्रावण हा उत्साहाचे कारंजे असलेला सण.  सुनंदा पाटील तथा गझलनंदा आपल्या शेरात श्रावणाच्या या उत्साहाचे वर्णन आपल्या गझलेत कसे करतात पाहा.
उत्साहाची घरात माझ्या अवघी पखरण झाली
ओलेती तू समोर येता क्षणात आला श्रावण
उत्साहाची पखरण करत कुणी तरी आलं तो श्रावणच होता. श्रावणाने आपल्याला ती आल्याचा संदेश दिला आहे. उत्साहाला उधाण येते श्रावण सरीतूनच. उत्साह वाटत (गिव्हिंग) राहणारा आहे. ओलेती होऊन सखी जेव्हा समोर येते तेव्हा जणू श्रावणातील मृद्गंध येत असल्याचा सुवास होत आहे. सखी ज्या क्षणी सामोरी येते त्याच क्षणी श्रावण आल्याचा भास होतो. न्हाती धुती सखी तिचे केस सुकवीत येते, तो निराळा मदनगंध येत असल्याचा भास गझलेला होतो. आनंदाचे हे गझलेत उत्साहाने नाचत आहेत.
रामहरी पंडित तथा चंद्राशू  यांना तर गझलेत पौराणिक संदर्भ दिले आहेत. श्रावण हा खरे तर भाव आणि भक्तीचा महिना आहे. त्या महिन्यात श्रीकृष्णाचा जन्म झाला. श्रीकृष्ण हे प्रेमभक्तीचे प्रतीक आहे. श्रावणाच्या भक्तिभावाने रामहरी पुनीत झाल्याचा आनंद व्यक्त करीत म्हणतात. -
श्रावणसर ही भक्तीमध्ये भिजते जेंव्हा
कृष्णाला मग राधा होउन पुजतो श्रावण
रामहरी पंडितांना वाटते की, श्रावणात बरसणाऱ्या सरी भक्तीभावाने पृथ्वीवर आलेल्या आहेत. श्रावणात प्रत्येक वाराला म्हणजे दिवशी एकेका दैवताचे पूजन केले जाते. जसे सोमवारी महादेवाचे, मंगळवारी मंगळागौर आणि भवानी मातेचे बुधवारी विठ्ठलाचे गुरुवारी दत्तात्रेयाचे असे सर्वच दिवशी प्रत्येक देवाचे पूजन हा श्रावण आपल्या सरींतून करत असतो. या भक्तीमध्ये या श्रावणसरी भिजून चिंब झाल्या आहेत. प्रत्येक देवतेवर त्या अभिषेक करीत आहेत. त्या मनमुराद भक्तिमय झाल्या आहेत. जन्माष्टमी असल्याने गझलकाराला वाटते की, हा श्रावण स्वतः राधा होऊन कृष्णाचे पूजन करीत आहे.
आप्पा कसबेकर म्हणतात की
मेघ बरसतो धरणी भिजते,सरावतो मग श्रावण.
ती ओलेती हिरवळ होते,समावतो मग श्रावण.
मेघाच्या बसरण्याने धरणी भिजून चिंब झाली की तृप्त होते. मेघाच्या सातत्याने बरसण्याने धरती भिजते आणि धरणीला स्नान घालण्यात तो पटाईत झाला आहे. सराईत झाला आहे. धरणीला फुलवण्याला तो सरावला आहे. सर्वत्र हिरवळ झालेली आहे. सततच्या उन पावसाच्या खेळाने ही हिरवळ आता ओलेती झाली आहे. पुन्हा गझलकाराला सखीची आठवण होते. तीही सुस्नात होऊन ओलेती बाहेर आली की अशीच हिरवी हिरवी भासते. तिच्यात हा श्रावण सामावून जात आहे. सगळ्याच गझलकारांना न्हातीधुती सखी भेटत आहे. यशवंत हिराबाई त्र्यंबक पगारे यांना तिची राहूनराहून परत आठवण होत आहे.
अल्लड होती श्रावणात ती भेटायाची होउन ओली
आज कोरडा झालो इतका डोळ्यांमधले सुकले पाणी
यशवंतरावांना वाटते आहे की त्यावेळी जशी ती भेटायची त्या अल्लड वयातील ती पावसात भिजून यायची तशीच ओलेती भेटायची. आपण ओलेती आहोत, याची जाणीव तिला नसायची तशीच त्या निरागस प्रियकराला ती आवडायची. तिचा अल्लडपणा गझलकाराला भावत असायचा. ते किशोरवयीन प्रेम आता पुन्हा अनुभवावे असेही वाटते. परंतु श्रावणसरीतून भेटलेला गंध तिची याद करून देतो. परंतु तिची आठवण करून देखील ती आता भेटत नाही. तिच्या आठवणींनी डोळे भरून येतात. विरहाच्या या आसवांनी तो दग्ध झाला आहे. आता तिच्या आठवणींनी डोळ्यांतील पाणी सुकले आहे. दुष्काळी भागाप्रमाणे त्याच मन कोरडे झाले आहे.
याच दिवसात नागपंचमी आणि नारळी पौर्णिमा हे सण येत असतात.



श्रावणात सणांची आणि आनंदाची बहार असते. कृष्णजन्माचा सोहळा यानंतर येतो. ही श्रावणाची भक्ती ओथंबून वाहत आहे. डॉ. सुनंदा शेळके म्हणतात,
नागपंचमी, कृष्णाष्टमी, रक्षाबंधन..
दही-हंडीतुन गोपाळांचा काला श्रावण
जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला असतो. तो गोपाळांनी गोड केलेला असतो. कृष्ण दह्याची गाडगी फोडायचा. त्यातील दही आणि तेथे ठेवलेले लोणी फस्त करायचा. आता दहीहंडी फोडण्याची स्पर्धा असते. त्यामुळे मस्ती करीत, चोरून दही फोडणाऱ्या श्रीकृष्णाची सर त्याला येत नाही. आता तो सारा व्यवहार झाला आहे.
तरुण गझलकार नीलेश कवडे हा आशावादी आहे. श्रावणात हमखास पाऊस येणारच असा त्याला विश्वास आहे. तोही आपल्या सखीला सांगतो, तू श्रावणामुळे आनंदित हो.
जरासा श्रावणावर तू भरवसा ठेव राणी
पुन्हा बहरेल ही धरती पुन्हा गाईल गाणी
तू श्रावणावर भरवसा ठेव. तो आपल्यासोबत श्रावणसरी घेऊनच येणार आहे. त्यामुळे मधल्याकाळात पावसाने ओढ दिल्याने सुकलेल्या पिकांना संजीवनी मिळेल आणि ही धरती पुन्हा हिरवीगार होऊन पुन्हा श्रावणाची गाणी गाईल. आनंदाने गवतफुले डोलू लागतील. श्रावण मग गाणी गाईल आणि मुली, लेकीबाळी, सुना फेर धरून गाणी गात धरणीला साथ देतील. त्यामुळे श्रावण अधिकच खुलून दिसेल.
श्रावण म्हटले की माहेराला लेकी बाळी येतात. झाडांना बाधलेल्या झुल्यावर उंचच उंच झोके घेतात. आयाबाया आणि मुलीचे बाप मुलीच्या सासरी सांगावा धाडून त्यांना बोलावून घेतात. नवविवाहितेचा भाऊ तिला न्यायला येतो आहे हा निरोप घेऊनच जणू श्रावण आला आहे, असे प्रसाद माधव कुलकर्णी म्हणतात.
चहूदिशांना निरोप धाडत श्रावण आला
माहेराला मुली बोलवा ,श्रावण हिरवा...
चारी दिशांना गेलेल्या सगळ्यांच्या मुली आता माहेरी याव्यात याची प्रतीक्षा श्रावणालाही लागली आहे. तो वाऱ्यामार्फत आणि पावसाच्या ढगांमार्फत जणु असा सांगावा धाडत आहे. माहेराला मुली बोलवा असा निरोप गेला की त्या धावत माहेरी येतील. त्यांना त्याची ओढ असतेच परंतु बोलावणे आल्याशिवाय नाही, असा करारी आणि स्वाभिमानी बाणा त्यांचा असतो. प्रकाश रामचंद्र क्षीरसागर तथा सागर शायर हेही या श्रावणाच्या आणि त्याच्या लीलांच्या प्रेमात पडतात ते म्हणतात,
श्रावणाचा मास आला कोण येईल न्याया
झाड पाहे वाट माझी कोण खेळणार झुला?
श्रावणाचा मास आला की, बंधूराया येईलच राखी बांधण्यासाठी न्यायला. नारळी पौर्णिमेला आईने साखर (नारळी) भात केला असेल. भाऊरायासाठी ती राखी आणून ठेवते. श्रावणी सण साजरे करण्यासाठी आई कुणाला तरी पाठवील मग माझ्या जुन्या मैत्रिणी, सख्या, सया एकत्र येतील. पारावरच्या झाडावर झुला असेल मग आमच्यात शर्यत लागेल की, कोणाचा झुला उंच जातो. या क्षणाची वाट ते पारावरील झाडही पाहत असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कृष्णलीला



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**आजची पिढी मात्र कृष्णलीला मानत नाही. सर्रास गुन्हे करीत आहेत. कोणावर बलात्कार करीत आहे. केवळ शरीराचाच बलत्कार नाही तर मानसिकही बलात्कार करीत आहेत. बोलण्यातूनही चांगल्या माणसांची मनं दुखावत आहे. राजगादीसाठी भांडणं होतात आहे.राजनेते कार्यकर्त्यांची लढाई जुंपवत आहेत. स्वतः मात्र टाळूवरचे लोणी खात आहेत. कृष्णाने राजगादी पाहिली नाही. कंस वधानंतर त्यांना हवं तर मथुरेची गादी भेटत होती. पण त्या कृष्णाने ती नाकारली व स्वतः आपले आजोबा उदयभानाला राजगादीवर बसवले. अर्थात राजगादीचा लोभ करु नका हाही संदेश कृष्णाने दिलेला आहे. कृष्णाने आपल्याला आजच्या जगात जगण्यास्तव बऱ्याच गोष्टी सांगितल्या. आपण कितपत त्या गोष्टीचा उपभोग घेतो हे आपल्यावरच अवलंबून आहे. तेव्हा तो निर्णय आपला आहे. एक मात्र नक्कीच की कृष्णलीलेत जीवन जगण्याचे सार दडले आहे.ते आपण नक्कीच शोधावे एवढंच शेवटी म्हणावेसे वाटते.**

कंस... कृष्णाचा कर्दनकाळ. प्रत्यक्ष त्याचा सख्खा मामा.पण त्याने आपल्या सख्ख्या सहा भागिनेयला का मारले असावे ही विचार करणारी बाब आहे. तशी रक्तरंजितही. मुळात राक्षसी वृत्तीचा असलेला कंस.आपल्या बहिणीने वासुदेवाशी प्रेमाने विवाह केलेल्या बहिणीचा विवाहरथ हाकत असताना आकाशवाणी झाली," हे कंसा, तु कोणाचा रथ हाकतोय. जिच्या पोटचा आठवा गर्भ तुझाच वध करणार आहे." सगळा डाव...राक्षसी वृत्तीच्या कंसाला संपविण्याचा. राक्षसी वृत्ती नष्ट करण्याचा डाव नाही तर माणूसच संपविण्याचा डाव.आपण आठवा मुलगा मारू. त्या आठव्या मुलाच्या वधासाठी एवढे भागिनेय का मारावे? कंसाचा त्यावर विचार. त्यातच पुन्हा भविष्यवाणी "कदाचित देवकीच्या आठव्या मुलाने पहिल्या पोराच्या वेळीच जन्म घेतला तर...." त्यातच देवकीचा आठवा पुत्र पहिल्याच मुलांच्या वेळी त्याचा जन्म झाला तर... कंसाच्या मनात सारखा विचार येत होता. कोणाला मृत्यूचे भय नाही.ते भय कंसालाही होते. यातूनच राग येवून कंसाने बहिण देवकी व वासूदेवाला कैदेत टाकले. साधी कैद नाही तर नजरकैद. मग कंस आपली बहिण गरोदर असल्याचे समजताच तिची देखभाल करायचा नव्हे तर पहारेक-यांमार्फत बारीक लक्ष ठेवायचा. जेव्हा बाळ जन्मायचं, तेव्हा त्याला नवीन कपडे घालून ठार करायचा.असे सहा पुत्र देवकीचे, देवकीच्या डोळ्यासमोर कंसाने ठार केले. मात्र कृष्ण व बलरामाला तो ठार करु शकला नाही. कंसाला जेव्हा माहीत झालं की आपल्या बहिणीचा सातवा व आठवा गर्भ जीवंत आहे व तो गोकुळात आहे. त्याने त्या बाळाला ठार करण्यासाठी कागेसन, पुतना, बकासूर इत्यादी राक्षसांना पाठवले. पण धिप्पाड शरीराच्या या राक्षसांना कृष्णाने केवळ युक्तीने ठार केले.

अंगूलीवर उचललेला गोवर्धन, कालियामर्दन तसेच पुतनेचा वध या गोष्टी कृष्णाच्या लीलेला शोभण्यासारख्या असल्याने त्यात चमत्कार दिसतो. पण त्यात चमत्कार होता की नव्हता हे आम्ही वास्तविक जीवनात जगणारी मंडळी सांगू शकत नाही. कोणी तर म्हणतात महाभारत घडलेलंच नाही. ती एक दंतकथा आहे. पण ती जरी दंतकथा असली तरी आजच्या वास्तविक जीवनात या दंतकथेपासून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आम्ही त्या काळातील या कृष्णलीलांना चमत्काराची जोड दिली असली तरी वास्तविक जीवनात कृष्णजन्म दंतकथा वाटत नाही.

कृष्ण जन्म मुळात रक्तरंजितेने सजलेला आहे. केवळ राक्षसी वृत्तीचा कंस... त्याने आपल्या बहिणीचा रथ हाकलला. पण आकाशवाणीच्या या तडाख्यात कंसाचे जीवन पार बदलून टाकले. कंसवध करणे म्हणजे राक्षसवृत्तीचा अंत करणे, त्याला जसा कृष्ण जीवंत असल्याचं माहीत झालं. तसा तो अधिक संतापत असे व कृष्णाला मारायला राक्षसावर राक्षस पाठवित असे. तरीही कृष्ण वाचल्याने तो अधिकच संतापत असे.

समाजात कोणत्याही गोष्टीचे दोन भाग पडतात. एक चीत भाग व दुसरा पट भाग. चीत अर्थात सत्य आणि पट अर्थात असत्य.जन्म झाल्यानंतर मृत्यू येणारच. तो कितीही थांबवला तरी थांबत नाही. परिवर्तन काळाची गरज आहे. जेव्हापर्यंत माणूस मरत नाही, तेव्हापर्यंत नवीन जन्म होत नाही. समतोलपणा हा सृष्टीचा नियम. तो तोडून कसा चालेल. इथे जेवढी वाईट माणसं आहेत.तेवढीच चांगलीही माणसं आहेत. कंस दरबारी जरी वाईट वृत्तीची माणसं असली तरी अक्रुरसारखी चांगली माणसंही होती.



कृष्णाची लीला सांगायची झाल्यास कालियाचा दंश वाचवून त्याच्या फणीवरच चढून थयथय नाच करणारा क्रिष्ण. त्याच्या पायाच्या वज्राने कालियाला शरण आणले. तसेच आपल्यावर जीव लावणाऱ्या रुख्मीनीला कृष्णाने पळवून आणले. ही एक मदतच होती. कारण रुख्मीनीसारख्या नाजूक कन्येला गुंडाच्या तावडीत न सापडू देणे हा कृष्णाचा उद्देश होता. म्हणून वेळप्रसंगी त्याला पळवून आणावं लागलं. तसेच जरासंघाच्या कुटील आक्रमणानं त्रस्त होवून आपल्या राजेरजवाड्याच्या भांडणात जनतेचं नुकसान होवू नये म्हणून क्रिष्णाने द्वारकेची निर्मीतीच समुद्रात केली. ही द्वारकेची निर्मीती आजच्या समुद्रावर बांधलेल्या सिंधुदुर्ग व विजयदुर्गसारखीच आहे. एवढंच नाही तर इंद्राचा अहंकार नष्ट करण्यासाठी अंगूलीवर उचललेला गोवर्धन हेही कृष्णलीलेचं उत्कृष्ट उदाहरण. एवढंच नाही तर या कृष्णाने शिशुपालाचे शंभर गुन्हे माफ करुन एकशे एक व्या गुन्ह्यात त्याचा वध केला यावरुन वर्तमानात कोणाचेही तेवढेच ऐका, जेव्हापर्यंत सहन होते. जेव्हा सहन होत नाही, तेव्हा प्रतिकार करा हा बोध मिळतो. आधुनिक काळ हा गुंडाचा काळ आहे. जिथे जावे तिथे गुंडेगिरीचा सामना करावा लागतो. अशावेळी या गुंडांनाही सबक कसा शिकविता येईल यासाठी ही क्रिष्णलीला कामी पडते.पण एखाद्याला वाटेल की क्रिष्णाने अशी कोणती लीला केली शिशुपालाला मारुन. ती तर हिंसा होती. त्याचा आजच्या काळात कोणता उपयोग? महत्वाचं म्हणजे एखाद्या स्त्रीवर एखादा पुरुष सतत अत्याचार करीत असेल, तर तो अत्याचार तिने शेवटपर्यंत सहन करु नये असा बोध शिशुपालाच्या वधातून मिळतो. मुळात ही क्रिष्णलीला ताकद, हिंमत, संयम शिकविते हे आपण लक्षात घ्यायला हवे. मित्रप्रेमाचे उदाहरण द्यायचे झाल्यास सुदाम्याची व क्रिष्णाची मैत्री वाखाणण्याजोगी आहे. सुदामा गरीब असूनही क्रिष्णाने त्याला अंतर पडू दिले नाही वा अंतर भासू दिले नाही. मित्रप्रेमासाठी सुदामनगरी बनवली तर राधेवरील मित्रप्रेमासाठी वृंदावन, दुर्योधनाचे म्हणण्यानुसार ते सत्यावर असत्याचं युद्ध लादू पाहात आहेत, हे माहीत असूनही दुर्योधनाला सैन्याची केलेली मदत... राग मनात असूनही संयम बाळगत रागावर नियंत्रण कसं ठेवावं हे ही कृष्ण शिकवतो नव्हे तर कृष्णाला द्रौपदीचा झालेला व कौरवांनी भर दरबारात अधर्म बाळगलेल्याचा दाखला मनात ठेवून या कृष्णाने या अधर्माचा नाश करण्यासाठी असत्याचाही आधार घेतला, नव्हे तर एक तत्व मांडलं की सत्य बाहेर आणण्यासाठी बोललेलं असत्य हे असत्य नसतं. आजही न्यायालयात अशाच प्रकारचे खटले चालतात. खटले निकाली काढताना त्या खटल्यात पुरावे तपासले जातात. काही मानवसदृश पुरावे असत्यही बोलतात. त्यात चांगल्या माणसांचे बळी जातात.पण एकही वाईट माणूस मात्र त्यातून सुटत नाही. महाभारतातील युद्धात पितामहा भीष्म, द्रोण, कर्ण, कृपाचार्य हे वीर योद्धे असून त्यांना कोणीही हरवू शकणार नव्हते. अशावेळी त्यांच्या कमजोरीचा फायदा घेवून जे काही करायला पांडवांना कृष्णाने बाध्य केलं. तो कृष्णाने केलेला अधर्म असला तरी त्याला अधर्म न मानून केलेलं कृत्य कृष्णलीलेचाच एक भाग आहे. प्रेमाच्या बाबतीत विचार केल्यास प्रेम करा, पण त्या प्रेमात वासना नको तर मदत करण्याची वृत्ती जणू कृष्ण-राधेचे प्रेम आणि राधेसाठी उत्पन्न केलेलं वृंदावन.

कृष्णलीलेची उदाहरणं भरपूर आहेत. द्रौपदीला साडी पुरविणारा कृष्ण अर्थात बहिणीची मदत करणारा भाऊराया या कृष्णाने साकारला आहे, नव्हे तर शत्रूलाही मित्र मानणारा कृष्ण हा काही एखाद्या देवदूतापेक्षा लहान नाही. कृष्ण हा माणुसच होता आपल्यासारखा. पण त्याच्या वेगवेगळ्या लीलांनी तो देवच वाटतो. कृष्णाचे बालपण असो की कृष्णाचे तरुणपण असो, कृष्णाने वेळप्रसंगी आपल्या लीला दाखवल्या. आजही त्या लीला आपल्या उपयोगात येतात. कृष्णाच्या बासुरीने मंत्रमुग्ध होणारी जनावरं. कला जोपासा पण ती मनापासून जोपासा. त्यात चालढकलपणा नको हेही कृष्ण शिकवून जातो. नव्हे तर आपल्या गोकुळातले दही दूध मथुरेला जावू नये. ते आपल्या गोकुळच्या लोकांना मिळावे म्हणून ते माठ फोडणारा कृष्ण संदेश देतो की आपल्या देशाचा माल देशातच विका. देशातीलच स्वदेशी बनावटीच्या वस्तू वापरा. विदेशी लोकांच्या वस्तू वापरू नका. आज चीनचा माल भारतात येत आहे. त्याचबरोबर घातक रसायनेही भारतात येत आहे. काल जेव्हा दुष्काळ पडला होता. तेव्हा गाजर गवत लालगुंजीच्या आयातीतून देन म्हणून भारताला मिळाली. आज घातक बिमाऱ्या. गाजरगवत पीकांचा शत्रू... पीक होवू देत नाही. तर आज चीनचे मोबाईल माणसांचे शत्रू. डोळ्यापासून तर डोक्यापर्यंतचे आजार. काल व्यापार लादण्यासाठी इंग्रज आले. दिडशे वर्ष राज्य करुन गेले. आज चीन येतोय. खरंच कृष्णलीला ही तमाम भारतीयांनो सावध व्हा असा संदेश देते. पण त्या गोष्टी आपण समजून घेण्याची गरज आहे. अन्यथा भारताचं सार्वभौमत्व धोक्यात येवू शकते.

कृष्ण जरी दह्यांचं चौर्य कर्म करीत असला तरी ते चौर्यकर्म नव्हतं. तुटपुंजे पैसे कमविण्यासाठी आपल्या लहानग्या बाळालाही ज्या महिला दही वा लोणी देत नव्हत्या. ते लोणी बाळाला देण्यासाठी या महिलांनी बाध्य व्हावं यासाठी ते चौर्य कर्म होतं.

खरंच कृष्णलीलेत वास्तविकता आहे. आपण आजही कृष्णदृष्टीकोण अंगीकारावा असाच आहे.

# साबुदाण्याची उसळ व वडे



रामकृष्ण बळीराम जोशी
संपर्क क्र. ९५२७४५४१८२

आधुनिक केसरी

**तसं तर आईच्या हातचे सर्वच पदार्थ रुचकर स्वादिष्ट बनतात. माझ्या आयुष्यात आई दुरावल्यानंत आईसारख्याच अनेक मायाळू हातानी मला सावरले. आई दुरावल्यानंतर मागील आठ वर्षांपासून उपवासाच्या दिवशी वहिनी उसळ व आमटी देतात. खूप दिवसांपासून उसळ व वडे यांवर चार शब्द लिहायचे होते. आज वहिनींनी उसळ दिली व मन लहानपणीच्या श्रावण महिन्यात रमले व चार शब्दांचा लेखनप्रपंच करण्याचा योग आला.**

आज श्रावण सोमवारचा उपवास असल्यामुळे वहिनींनी डब्यात गरमागरम उसळ दिली. डबा आणतानाच उसळीचा खमंग वास दरवळत होता. मला तर कधी एकदा घरी जाऊन उसळीचा आस्वाद घेतो असं झालं होतं. घरी आल्यावर उसळ खायला बसलो.. सळीचा घास घेतला आणि क्षणात आज आईच्या हातच्या उसळीची आठवण झाली.

आज स्वातंत्र्यदिन असूनही आजची तिथी चतुर्थी असल्यामुळे सकाळपासूनच मन थोडं सैरभैर झाले होते. झेंडावंदन करून महाविद्यालयातून आल्यावर आईच्या आठवणीने व्याकुळ झालो होतो. सव्वाआठ वर्षांपूर्वी चैत्र चतुर्थीला आई दुरावली आणि प्रत्येक चतुर्थीला आईची आठवण प्रकर्षाने येते.

आईसुद्धा अशीच उसळ करायची. तोच खमंग वास आणि आईच्या मायेने वहिनींनी बनविलेली उसळ खाताना आईच्या हाताची चव जिभेने पुन्हा अनुभवली.

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्या की जून महिन्यात शाळा सुरू व्हायच्या. शाळा सुरू झाल्यावर अवघ्या एक महिन्याने श्रावण महिना सुरू व्हायचा. लहानपणी श्रावण महिना मला खूप आवडायचा त्याला दोन कारणे होती.

एकतर त्यावेळी श्रावणात तीन-तीन दिवस पावसाची झड लागायची त्यामुळे शाळेत आम्ही सर्व सवंगडी पावसाच्या पाण्यात मनसोक्त हुंदडतच शाळेत पोहचायचो. आणि दुसरं आणि महत्वाचे कारण म्हणजे श्रावण महिन्यात आईला पंधरा ते अठरा दिवस उपवास असायचे व उपवास असला की आई हमखास उसळ करायची. सकाळीच शाबुदाणा भिजवून ठेवायची.

श्रावण सोमवारी शाळेला मध्यंतरानंतर सुट्टी असायची. शाळा सुटली की मी पळतच घरी जायचो कारण मला वेध लागायचे ते शाबुदाणा उसळ खायचे. मी घरी गेल्यावर आई स्टोव्हवर (त्यावेळी घरी गॅस नव्हता उमराव कंपनीचा वातीचा स्टोव्ह होता) कढई ठेवून त्यात तूप, हिरव्या मिरच्या ,बटाट्याच्या फोडी यांची फोडणी देऊन भिजवलेला शाबुदाणा व शेंगदाण्याचा कुट्टा टाकायची. (त्यावेळी घरी मिक्सर नव्हते दगडी खलबत्त्यात आई शेंगदाणे कुटून मस्त चवदार कुट्टा करायची) एकजीव होईपर्यंत कढईत उसळ हलवायची. चवीला शेंदीलोन टाकायची (त्यावेळी शेंदीलोनाचा मोठा खडा मिळायचा तोही खलबत्त्यात कुटून बारीक त्यांचे शेंदीमीठ तयार करावे लागे. आजच्या काळात तर आयतेच शेंदीमीठ मिळते.)

उसळीचा तो खमंग वास अवघ्या घराच्या बाहेर अंगणातील तुळशीवृंदावना पर्यत दरवळायचा. आई मला आवाज द्यायची मग काय उसळ खाल्यावर मस्त एक ढेकर दयायचो. आई म्हणायची अरे दत्ता उपवासाच्या दिवशी ढेकर देऊ नये. आईने मला सांगितले होते की दत्ता उपवासाच्या दिवशी फक्त देवाचे नामस्मरण करावे आणि अर्धपोटी राहावे.



खरं तर आई फक्त माझ्यासाठीच उसळ करायची बिचाऱ्या माऊलीला कामाच्या व्यापात उरलेली चार घास उसळ खायला दोन अडीच वाजायचे. माझ्या माउलींच्या नशिबात फक्त कष्टच लिहीले होते. पाळणाघर, मेस बाहेरील बाजारहाट करणे, यातच तिचा अख्खा दिवस जायचा. मी विचार करायचो आई दुपारी चार घास खाल्यानंतर रात्री दहा वाजता उपवास सोडायची. त्या चार घासावरच ती सतत काम करायची. खरच त्या माऊलीला कुठून शक्ती यायची ते देवच जाणे असं मनोमन मला वाटायचे.

आई शाबुदाणा उसळी सारखेच शाबुदाणा-वडेही चवदार बनवायची. तिच्या हातचे स्वादिष्ट व रुचकर वडे व्हायची. जिभेवर वडा ठेवला की चावायचे कामच नसायचे.

लेख लिहीताना आठवले आम्ही २००४ ते २००८ चार वर्षे विद्या नगर येथे नाकाडे दादांच्या वाडयात वास्तव्यास होतो. माझी पुतणी सानिका त्यावेळी लहान होती. तीन वर्षांची असताना तिला आईच्या हातचे शाबुदाण्याचे वडे खूप आवडायचे. दर गुरुवारी आई शाबूदाणा वडे करायची. सानिकाला बोलावले की ती पळतच येऊन आईच्या हातचा वडा खायची. विशेष म्हणजे तिला शाबुदाणा वडे पोटातून आवडायचे.

तसं तर आईच्या हातचे सर्वच पदार्थ रुचकर स्वादिष्ट बनतात. माझ्या आयुष्यात आई दुरावल्यानंत आईसारख्याच अनेक मायाळू हातानी मला सावरले. आई दुरावल्यानंतर मागील आठ वर्षांपासून उपवासाच्या दिवशी वहिनी उसळ व आमटी देतात.

खूप दिवसांपासून उसळ व वडे यांवर चार शब्द लिहायचे होते. आज वहिनींनी उसळ दिली व मन लहानपणीच्या श्रावण महिन्यात रमले व चार शब्दांचा लेखनप्रपंच करण्याचा योग आला.

# हे देवाघरचे देणे...



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**आपल्याला चित्रपटातील, टी व्ही वरील मालिकातून नायक नायिकेचे प्रेम बघायचे इतकी सवय झालेली आहे की हे सगळे आपण पाहतो ते म्हणजेच प्रेम असा आपला समज होत असतो. इतकं ते आपल्या रक्तात भिनलेले असते जणू. मंगेश पाडगावकर यांची 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आणि आमचं सेम असतं..' या ओळी आम्हाला पाठ असतात किंवा ऐकून माहिती असतात. पण खरं प्रेम कसं असतं? ' प्रेमा तुझा रंग कसा?' प्रेम हे सर्वव्यापी आहे. प्रेमाला स्वतःचा मुळचा रंग नाही. प्रेम हे पाण्यासारखे असते. 'पानी तेरा रंग कैसा, जिसमे मिला दो लगे उस जैसा ...' एक सुंदर मराठी गीत आहे, 'प्रेमाला उपमा नाही, हे तो देवाघरचे देणे..' खरंच किती सुंदर शब्द आहेत ! प्रेम हे देवाघरचे देणे आहे.**

काल सुप्रसिद्ध गायक मुकेश यांचं एक गाणं ऐकत होतो. ' मेरा प्यार भी तू है, ये बहार भी तू है..' हे ते सदाबहार गीत. हे गीत पडद्यावर राजेंद्रकुमार आणि वैजयंतीमाला यांच्यावर चित्रित झाले असून सुमन कल्याणपूर आणि मुकेश यांचे हे अजरामर आणि अवीट गोडीचे द्वंद्वगीत आहे. आपला असा समज होण्याची शक्यता आहे की मी आज स्व. मुकेश यांच्याविषयी किंवा या गीताविषयी बोलणार आहे पण खरे तर मला सांगायचे आहे ते वेगळेच. जेव्हा राजेंद्रकुमार वैजयंती मालाला म्हणतो की 'मेरा प्यार भी तू है...' तेव्हा त्याला तिच्या ठायी निसर्गातील सगळ्या गोष्टी असलेल्या प्रतिबिंबित होतात. निसर्गातील फुलात, सगळ्या निसर्ग सौंदर्यात जणू तिचाच भास त्याला व्हायला लागतो. किंवा दुसऱ्या एखाद्या गीतात एखादा प्रियकर आपल्या सुंदर प्रेयसीकडे पाहून म्हणतो, 'तेरे चेहरेसे नजर नही हटती, नजारे हम क्या देखे...' असे चित्रपटातील नायक आणि नायिकेचे प्रेम आपण नेहमी पडद्यावर पाहतो. किती छान वाटते हे सगळे बघायला आणि ऐकायला सुद्धा..! सगळे कसे ROMANTIC...! ' क्या यही प्यार है...? '

आपल्याला चित्रपटातील, टी व्ही वरील मालिकातून नायक नायिकेचे प्रेम बघायचे इतकी सवय झालेली आहे की हे सगळे आपण पाहतो ते म्हणजेच प्रेम असा आपला समज होत असतो. इतकं ते आपल्या रक्तात भिनलेले असते जणू. मंगेश पाडगावकर यांची 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आणि आमचं सेम असतं..' या ओळी आम्हाला पाठ असतात किंवा ऐकून माहिती असतात. पण खरं प्रेम कसं असतं? ' प्रेमा तुझा रंग कसा?' प्रेम हे सर्वव्यापी आहे. प्रेमाला स्वतःचा मुळचा रंग नाही. प्रेम हे पाण्यासारखे असते. 'पानी तेरा रंग कैसा, जिसमे मिला दो लगे उस जैसा ...' एक सुंदर मराठी गीत आहे, 'प्रेमाला उपमा नाही, हे तो देवाघरचे देणे..' खरंच किती सुंदर शब्द आहेत ! प्रेम हे देवाघरचे देणे आहे.

प्रेम हे जीवनाच्या वेलीवर उमललेले सर्वात सुंदर फुल आहे ! फुलासारखेच नाजूक आणि सुंदर. जणू काही ' जपून हाताळा ' दुष्ट आणि क्रूर मानवी भावनांनी ते करपून जाते. त्याला सतत मायेचे पाणी घालावे लागते नाही तर ते कोमेजण्याचा धोका असतो. प्रेमाचे एक वैशिष्ट्य आहे. प्रेम दिल्याने वाढते. जेवढे देऊ त्याच्या अनेक पटींनी परत मिळते. जसे शेतात काही मुठ दाणे पेरावे आणि अनेक पटींनी पीक घ्यावे. WHAT WE GIVE,WE GET BACK IN ABUNDANCE. प्रेम दिले तर प्रेम मिळेल आणि द्वेष पेरला तर द्वेशाचेच पिक येईल. म्हणूनच तर आपण ' पेरावे तसे उगवते ' असे म्हणतो. एकदा गौतम बुद्धांकडे एक गरीब माणूस आला. तो म्हणाला, ' महाराज मी गरीब का आहे ते सांगावे.' बुद्ध त्याला म्हणाले, ' तू तुझ्याजवळ असलेले लोकांना देत नाहीस म्हणून तू गरीब आहेस.' त्याने विचारले की माझ्याजवळ काय आहे देण्यासारखे? बुद्ध म्हणाले, 'अरे लोकांना प्रेम तर देऊ शकतोस की नाही, लोकांशी प्रेमाने तर बोलता येईल की नाही ?' मग बघ तू गरीब राहणार नाहीस. किती सुंदर उपदेश बुद्धांचा...!

खरे प्रेम कसली अपेक्षा करीत नाही. आई आपल्या मुलांवर निरपेक्ष प्रेम करते. तिला कोणती अपेक्षा असते? आपल्या वृद्धापकाळी आपल्याला हे मूल सांभाळील या भावनेनेच ती त्याचे सगळे करते का? पित्याचेही मुलांवर असेच निरपेक्ष प्रेम असते. त्यांनी आपल्या आईवडिलांना वृद्धापकाळी सांभाळायचे की नाही हा प्रश्न या प्रेमापुढे गौण ठरतो. असेच प्रेम भावंडांचे एकमेकांवर असते. पण जिथे नात्यात स्वार्थ आला तिथे प्रेम संपते. स्वार्थ, कपटीपणा या सारख्या भावनांनी प्रेमाचे फुल करपते. पती पत्नींचे एकमेकांवरील प्रेम असेच निरपेक्ष असते, असले पाहिजे. लग्नानंतरचे मंतरलेले जादुई दिवस काही वर्षातच भुरकन उडून जातात. मग वास्तवाला सामोरे जावे लागते. एकमेकांच्या स्वभावातील दोष, उणीवा जाणवू लागतात. पण खरे प्रेम या सर्व गुणदोषांसह समोरच्याचा



स्वीकार करते. तसे नसेल तर ते खरे प्रेम नाहीच असे समजायला हरकत नाही.

मी वाचलेली एक गोष्ट या ठिकाणी सांगण्याचा मोह आवरत नाही. एका डॉक्टरांचे हे निवेदन आहे. ते त्यांच्याच शब्दात. " सकाळची ८.३० ची वेळ. माझ्या दवाखान्यात कोणीही रुग्ण नव्हता. एवढ्यात एक ८० वर्षांचे वृद्ध गृहस्थ दवाखान्यात आले. त्यांच्या अंगठ्याला जखम झालेली होती. तिला टाके घातलेले होते. हे टाके काढण्यासाठी ते माझ्याकडे आले होते. ते मला म्हणाले डॉक्टर, लवकर माझी जखम बघा आणि टाके काढा. मला दुसरीकडे जायचे आहे. माझी नऊ वाजताची दुसरीकडे APPOINTMENT आहे. दवाखान्यात गर्दी नसल्याने मी त्यांचा रक्तदाब इ. तपासला. आणि त्यांच्या जखमेचे परीक्षण करू लागलो. जखम बऱ्यापैकी भरली होती. मी सहाय्यक डॉक्टरांना टाके काढण्याचे साहित्य घ्यायला सांगितले.

जखमेचे टाके काढले आणि जखमेची मलमपट्टी करताना त्यांच्याशी बोलू लागलो. मी विचारले, तुम्हाला दुसऱ्या डॉक्टरांकडे जायचे आहे का ? त्यावर ते म्हणाले, मला माझ्या पत्नीला भेटायला जायचे आहे. ती शुश्रुषा गृहात आहे. मी दररोज सकाळी तिच्यासोबत नाश्ता करतो. मग मी विचारले की कशी आहे त्यांची तब्येत ? त्यावर ते म्हणाले ती वृद्धापकाळी होणाऱ्या विस्मृतीच्या आजाराने (ALZHEIMER DISEASE) ग्रस्त असून गेली पाच वर्षे अंथरुणावर आहे. मी विचारले की तुम्हाला उशीर झाला तर त्या काळजी करतील का ? यावर ते म्हणाले की गेली पाच वर्षे ती मला ओळखत नाही. त्यामुळे माझी काळजी करण्याचा प्रश्नच येत नाही.

मी आश्चर्यचकित होऊन विचारले की त्या तुम्हाला ओळखतही नाहीत आणि तरीही तुम्ही गेली पाच वर्षे त्यांना नियमाने भेटायला जात आहात ? यावर त्यांनी दिलेले उत्तर मला थक्क करणारे होते. ते म्हणाले, मग काय झाले ? ती जरी मला ओळखत नसली तरी मी तिला ओळखतो ना..! अशा वेळी साथ सोडायची का ? आणि त्यांनी माझा हात हलकेच थोपटला. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यातील नकळत येणारे अश्रू मी रोखले. "

असे असते खरे प्रेम. खरे प्रेम केवळ शारीरिक नसते किंवा ROMANTIC ही नसते. खरे प्रेम म्हणजे जे काही आहे, असणार आहे या सगळ्यांचा स्वीकार करणे. जगातील सर्वात सुखी दिसणाऱ्या माणसांना सर्वच गोष्टी उत्तम मिळालेल्या असतात असे नाही पण जे काही मिळाले आहे त्यातून सर्वोच्च आनंद मिळवण्याची त्यांची क्षमता आणि मानसिक तयारी असते. म्हणूनच ते सुखी आणि समाधानी असतात.

मंडळी, आपला दिवस शुभ जावो.

# अक्षय ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्यात अपयश



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जगाला पर्यावरणीय विनाशाच्या उंबरठ्यावर आणून ठेवणाऱ्या श्रीमंत राष्ट्रांनी ठरल्याप्रमाणे पुरेसे अनुदान दिले तर हे पुरेशा वेगाने होईल. पुनर्जीवि वीज-क्षेत्रातील क्रांतीमुळे अमेरिकेत 2030 पर्यंत सर्व मोठी, मध्यम वाहने व 2035 पर्यंत सर्व लहान मोटारी बॅटरीवर चालणारी असतील असे अमेरिकन सरकारने जाहीर केले आहे. श्रीमंत राष्ट्रांनी पुरेसे अनुदान, तंत्रज्ञान दिले तर भारतातही तसे करणे शक्य आहे. उद्योजक आणि सरकारने याकडे गांभीर्याने पाहायला हवे.**

आपली वीजनिर्मिती ही पर्यावरण मारक कोळशाच्या ज्वलनातून निर्माण होते. हे प्रमाण साधारण 80 टक्के आहे. बाकीची ऊर्जा अणू प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प आणि पवनऊर्जा माध्यमातून मिळवतो. राजकीय इच्छाशक्ती आणि भांडवल यांचा मेळ बसला तर यापुढील काळात पर्यावरणस्नेही मार्गांनी आपली ऊर्जानिकड भागू शकेल. मात्र तसे होताना दिसत नाही. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार असे दिसून आले आहे की, देशात अक्षय ऊर्जा योजना राबविण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकार पूर्ण करू शकलेले नाही. अशा 70 टक्के योजना अजून लटकलेल्या आहेत. केंद्र सरकारच्या एका अहवालाने अक्षय ऊर्जा उत्पादनाच्या स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

केंद्र सरकारने 50 हून अधिक सोलर पार्क आणि अल्ट्रा मेगा सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून 2022 पर्यंत 40 गिगावॅट सौरऊर्जेचे उद्दिष्ट ठेवले होते. नुकताच ऊर्जा व्यवहारविषयकचा अहवाल स्थायी समितीने संसदेत मांडला.अहवालानुसार, 17 राज्यांमध्ये 22879 मेगावॅट क्षमतेचे 39 सौर ऊर्जा पार्क उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या मंजूर सोलर पार्कपैकी आठ पार्कच्या पायाभूत सुविधा पूर्ण विकसित झाल्या आहेत. त्यांची केवळ 6580 मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीची क्षमता आहे. याशिवाय चार सोलर पार्क अर्धवट विकसित असून त्यांची क्षमता 1365 मेगावॅट आहे. त्याचबरोबर 17121 मेगावॅट क्षमतेच्या 11 पार्कांना मंत्रालयाकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही. तर हे सर्व पार्क 2022 पर्यंत विकसित करावयाचे होते. आतापर्यंत केवळ 20 टक्के सोलर पार्क पूर्ण विकसित झाले आहेत आणि 10 टक्के अर्धवट विकसित झाले आहेत. त्यामुळे आतापर्यंत 70 टक्के उद्दिष्ट गाठता आलेले नाही. तीन वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही देशातील 50 पैकी 11 सौर पार्कांना अद्याप मंत्रालयाची मंजुरी मिळालेली नाही, असे समितीने अहवालात निदर्शनास आणून दिले आहे. मंत्रालय स्तरावर मंजुरी मिळण्यासाठी एवढा वेळ लागल्याने लक्ष्य निश्चित करण्याची संपूर्ण कसरत निरर्थक ठरली आहे. अशीच दिरंगाई होत राहिली तर आपला देश अक्षय ऊर्जा क्षेत्रात भरारी कसा घेणार असा प्रश्न आहे.



देशात आपली अणुऊर्जा वीजनिर्मिती तीन टक्के इतकीही नाही. देशातील नद्यांवर धरणे बांधण्यावर मर्यादा आहेत. त्यामुळे जलविद्युतीचा हात आखडताच आहे. मात्र पवन ऊर्जा आणि सौर ऊर्जा यांच्या माध्यमातून कोळशावरचे अवलंबित्व कमी करता येईल. सध्याला आपल्याला हेच महत्त्वाचे आहे. हवेतील प्रदूषण नियंत्रणात आणताना आणि पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीवर मात करण्यासाठी बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांचा वापर वाढला पाहिजे. कोळसा आणि वाहन इंधन यांवर भारताचा पैसा बराच खर्च होत आहे.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाची वीजनिर्मिती क्षमता केवळ 1.4 गिगावॅट (एक गिगावॅट म्हणजे एक हजार मेगावॅट) होती. ती जवळजवळ 150 पटींनी वाढून 2012 साली ऑक्टोबरमध्ये 209 गिगावॅट झाली. यातील औष्णिक विद्युत (कोळसा, डीझेल, नैसर्गिक इंधन वायू), जलविद्युत, पुनर्निर्माणक्षम स्रोत आणि अणुवीज यांचा वाटा अनुक्रमे 65.6, 20, 12 आणि 2.5 टक्के आहे. जलविद्युत, पुनर्निर्माणक्षम स्रोत यांच्यातून वीज निर्मिती वाढली पाहिजे.प्रत्यक्ष पवन विद्युतनिर्मितीमध्ये प्रदूषण, किरणोत्सार होण्याचा प्रश्न नाही. त्यामुळे ही अक्षय ऊर्जा बऱ्याच प्रमाणात स्वच्छदेखील आहे. समुद्रकिनारी आणि उंचावर वारा जास्त वेगाने वाहतो. अशा जागा पवन ऊर्जेसाठी उपयुक्त आहेत. 'एनर्जी स्टॅटिस्टिक्स-2013' या प्रकाशनातील ऊर्जा सांख्यिकीनुसार मार्च 2012 पर्यंत भारतात 17.3 गिगावॅट शक्तीची पवन ऊर्जानिर्मिती केंद्रे प्रत्यक्ष उभारलेली आहेत. जास्त उंचीच्या पवनचक्क्या उभारल्या तर देशात सुमारे 50 गिगावॅट (उंची 50 मीटर) किंवा 2000 ते 3000 गिगावॅट दरम्यान (उंची 100 आणि 120 मीटर) पवन विद्युतनिर्मितीक्षमता उभारणे शक्य आहे. बर्कली विद्यापीठाचा अहवाल म्हणतो की भारताला ऊर्जेचा प्रश्न सोडविण्यासाठी खर्चीक, जोखमीच्या, किरणोत्सारी अणुऊर्जेचा विचार करायची गरज नाही. या अहवालाची चिकित्सा करून पवन ऊर्जा या पर्यायाचा गंभीरपणे विचार केला पाहिजे.

सूर्य हा पृथ्वीवरील बऱ्याचशा ऊर्जास्रोतांचा उगम आहे. जगाचा 2004 साली सर्व प्रकारच्या ऊर्जेचा वापर जेवढा होता, साधारण तेवढीच ऊर्जा सूर्य दर तासाला पृथ्वीकडे प्रक्षेपित करतो आणि पृथ्वीच्या अंतापर्यंत हे काम चालू राहील. वर्षांचे तास 8766 असल्याने ही ऊर्जा जागतिक गरजेच्या सुमारे 8 हजार पट तरी जास्त आहेच. मुख्यतः प्रकाश आणि उष्णता या दोन रूपांत सौर ऊर्जा आपल्यापर्यंत पोहोचते. ही वीजनिर्मिती कसलेही प्रदूषण किंवा किरणोत्सार वाढवत नाही. सौर वीजनिर्मिती केंद्र वर्षांच्या आत उभारले जाऊ शकते. या तुलनेत अणुवीजनिर्मिती आणि औष्णिक वीजनिर्मिती केंद्र उभे करण्यासाठी अनुक्रमे आठ ते बारा आणि चार ते सहा वर्षे लागतात. असे असले तरी कमी कार्यक्षमता आणि प्रति युनिट वीजनिर्मितीचा जास्त खर्च या दोन अडचणी सौर ऊर्जेशी निगडित होत्या आणि आजही काही प्रमाणात आहेत. अलीकडे या रूपांतराची कार्यक्षमता साधारणपणे 15 ते 20 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. ही वीज बॅटरीत साठवून नंतर वापरणे खर्चीक असते. तुलनेने ती ग्रिडला जोडून वापरली, तर तिची किंमत निम्मी होते. सोलार फोटोसेलच्या तंत्रज्ञानात वेगाने सुधारणा होत आहेत. त्यामुळे 2010 सालीच काही विकसित देशांतील सौरवीज आणि अणुवीज निर्मिती खर्च एका पातळीवर आलेला आहे. भारतातही जवाहरलाल नेहरू सौर ऊर्जा मिशनने तर 2030 सालापर्यंत सौर विजेची किंमत दगडी कोळसा जाळून केलेल्या विजेएवढीच असेल अशी तयारी चालविली आहे.

तंत्र-वैज्ञानिक प्रगतीमुळे पुनर्जीवि (रीयुजेबल) विजेचा उत्पादन-खर्च गेल्या दहा वर्षांत एकपंचमांश झाल्याने इतर कोणत्याही विजेपेक्षा पुनर्जीवि वीज स्वस्त झाली आहे. त्यामुळे कारखाने, कचेऱ्या, रेल्वे, इ.साठी दिवसा लागणारी सर्व वीज थेट पवन वा सौर- वीज- केंद्रातून मिळवणे शक्य आणि परवडणारे झाले आहे. दुसरे म्हणजे बॅटरी-तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे गेल्या दहा वर्षांत बॅटरीच्या किमती 89 टक्के घसरल्या. त्यामुळे पवन वा सौर-वीज-केंद्रातून जादा वीज बनवून ती बॅटरीमध्ये साठवायची आणि रात्री वा वारा पडलेल्या वेळात ती वापरायची असे धोरण घेणे शक्य व परवडणारे झाले आहे. त्यातून 2035 पर्यंत कोळसा- विजेला निरोप देऊन पुनर्जीवि विजेचा वाटा 100 टक्के करू असे अमेरिकन सरकारने जाहीर केले आहे. भारतातही कोळसा-विजेला घटस्फोट देणे शक्य आहे कारण पवन व सौर ऊर्जा मिळून त्यासाठीचे ऊर्जा स्रोत पुरेसे आहेत असे संशोधन सांगते. पुरेसे पुनर्जीवि-वीज प्रकल्प उभारण्यासाठी पुरेसे भांडवल उभारण्याचा प्रश्न आहे. जगाला पर्यावरणीय विनाशाच्या उंबरठ्यावर आणून ठेवणाऱ्या श्रीमंत राष्ट्रांनी ठरल्याप्रमाणे पुरेसे अनुदान दिले तर हे पुरेशा वेगाने होईल. पुनर्जीवि वीज-क्षेत्रातील क्रांतीमुळे अमेरिकेत 2030 पर्यंत सर्व मोठी, मध्यम वाहने व 2035 पर्यंत सर्व लहान मोटारी बॅटरीवर चालणारी असतील असे अमेरिकन सरकारने जाहीर केले आहे. श्रीमंत राष्ट्रांनी पुरेसे अनुदान, तंत्रज्ञान दिले तर भारतातही तसे करणे शक्य आहे. उद्योजक आणि सरकारने याकडे गांभीर्याने पाहायला हवे.

# अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीची विश्वास आरोटे यांना डॉक्टरेट पदवी

## पत्रकारांचे संघटन आणि सामाजिक कार्याचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज



**दिल्ली :** अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्वास आरोटे यांना पत्रकारिता, संघटन आणि सामाजिक कार्यासाठी डॉक्टरेट पदवी युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ.सँग ओन पार्क यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दिल्ली येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आली. गरीब कुटुंबात जन्म झाल्याने सुरुवातीला मिळेल ते काम करत, वृत्तपत्र वाटप करुन शिक्षण घेऊन पत्रकारिता क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला. पत्रकार संघटनेच्या माध्यमातून राज्यभरातील विस्थापित पत्रकारांचे संघटन करुन त्यांच्या न्याय हक्कासाठी विश्वास आरोटे यांनी वीस वर्षांपासून चालवलेल्या प्रयत्नाची अमेरिकेतील नामांकित विद्यापीठाने दखल घेऊन त्यांचा गौरव केला आहे.

दिल्ली येथे 14 ऑगस्ट रोजी अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या वतीने भारतामधील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या चोवीस लोकांना डॉक्टरेट पदवी देऊन अमेरिकेच्या युनिव्हर्सिटीने सन्मानित केले. यात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्वास आरोटे यांचा सन्मान करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील विठे (ता.अकोले) येथे गरीब कुटुंबात जन्मलेल्या विश्वास यांनी जन्मगावातच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर राजूर येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मिळेल ते काम करत शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीच्या काळात दारोदारी वृत्तपत्र विकून त्यांनी उदरनिर्वाह केला. त्यातुनच वृत्तपत्र क्षेत्राशी नाळ जोडली गेली. एक रुपयाही भांडवल नसताना वृत्तपत्र सुरू करुन त्यांनी उत्तर महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली. पत्रकारीता करत असतानाच शहरी, ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना मदतीचा हात देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून राज्यभरातील पत्रकार व वृत्तपत्राशी संबंधित श्रमिकांचे मजबुत संघटन उभा केले. वीस वर्षापेक्षा अधिक काळापासून पत्रकार संघटनेच्या व्यासपीठावरुन त्यांनी पत्रकारांच्या समस्या आणि वृत्तपत्रांचे प्रश्न सरकार दरबारी मांडून सोडवण्यासाठी संघर्ष केला आहे. पत्रकारांना अडचणीच्या काळात मदतीला धावून जात पत्रकारांमध्ये एक विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. तर पत्रकार संघटनेच्या माध्यमातून राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून पत्रकार संघटनेला त्यांनी सामाजिक सेवेचा चेहरा दिला आहे. कोरोना काळात राज्यभर पत्रकारांना आणि अडचणीतील लोकांना किराणा कीटपासून ते रुग्णवाहिका, औषधोपचार यासाठी मदतीचा यज्ञच चालवला. दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीचा हात दिला. या कार्याची अमेरिकेतील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीने दखल घेऊन त्यांचा गौरव केला. त्याबद्दल पत्रकारांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

**सहकाऱ्यांच्याच कामाचा गौरव : विश्वास आरोटे**

पत्रकारिता करत असताना स्व. मुरलीधर बाबा शिंगोटे यांचा संपर्क आला आणि त्यांच्या सहवासाने या क्षेत्रात काम करण्याची ऊर्जा निर्माण झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे आणि प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यामुळे पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी सामान्य पत्रकारांपर्यंत पोहचता आले. पत्रकार संघटनेतील पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच आणि त्यांच्या कामामुळेच चांगले काम होत आहे. त्यामुळे अमेरिका युनिव्हर्सिटीने डॉक्टरेट देऊन माझा गौरव केला असला तरी हा सहकाऱ्यांच्याच कामाचा गौरव आहे, अशी भावना विश्वास आरोटे यांनी व्यक्त केली.

# राष्ट्रवादी-भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** डोंबिवली पूर्वेकडील भोपर परिसरात राजकीय वादातून राष्ट्रवादी भाजप कार्यकर्ते आपापसात भिडल्याची घटना आज सकाळच्या सुमारास घडली. राष्ट्रवादीचे पदाधिकारी ब्रम्हा माळी हे आपल्या जिममध्ये असताना जुन्या राजकीय वादातून भाजप पदाधिकारी कुंदन माळी आपल्या काही कार्यकर्त्यासह जिममध्ये गेले आणि त्यांनी ब्रम्हा माळी यांना मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या राजकीय वादात भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या समर्थकांमध्ये अरेरावी झाली. जीमच्या आतच एक तरूणाला तिघांनी मिळून दमदाची करत मारहाणीचा सीसीटीव्ही व्हिडिओ कॅमेरात कैद झाला आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात दोन्ही गटातील आठ जणांविरोधात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करत त्यांना अटक करण्यात आली आहे.

कल्याण डोंबिवलीच्या ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून राजकीय वाद अनेकदा विकोपाला गेल्याचे पाहायला मिळाले आहे. आता या ठिकाणी पुन्हा नवा वाद समोर आला आहे. थेट जिममध्येच राष्ट्रवादी आणि भाजपचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याचे पाहायला मिळाले आहे. आज सकाळी राष्ट्रवादीचे ब्रह्मा माळी हे जिममध्ये होते. यावेळी भाजपाचे पदाधिकारी कुंदन माळी हे आपल्या कार्यकर्त्यांसह जिममध्ये आले. जुन्या राजकीय वादातून कुंदन आणि ब्रह्मा यांच्यामध्ये वाद झाला. अखेर भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. तिघे जण मिळून एकाला मारहाण करताना व्हिडिओत दिसून आले आहे. तर एक व्यक्ती या भांडणामध्ये पडून मारहाण करणाऱ्यांना अडवताना दिसत आहे.



# विद्यापीठावर नुटा संघटनेचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** विभागातील शेकडो प्राध्यापक आज आपल्या न्याय्य मागण्यांसाठी कुलगुरू कार्यालयावर धडकले. १८ जुलै २०१८ चे यूजीसी रेग्युलेशन राज्य सरकारांना जसेच्या तसे लागू करणे बंधनकारक असतांनाही राज्य सरकारने त्यामध्ये मोडतोड केली, त्याची झड आज सर्व शिक्षकांना सोसावी लागत आहे. तसेच सरकारने बेकायदेशीरपणे कापून घेतलेल्या ७१ दिवसांच्या वेतनासंबंधी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांची पूर्णतः अंमलबजावणी केली नाही. त्याविरुद्ध एफुक्टोने जाहीर केलेल्या आंदोलनाच्या विविध टप्प्यांमध्ये राज्यभरातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. परंतु शासन-प्रशासनाने प्राध्यापकांच्या मागण्यांची दखल न घेतल्यामुळे अमरावती विभागातील विविध महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापक आज धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

दुपारी चार वाजता सुरु झालेल्या या धरणे आंदोलनात नुटा व एमफुक्टोचे उपाध्यक्ष डॉ. विवेक देशमुख यांनी यांच्या भाषणातून यूजीसी रेग्युलेशनमधील बंधनकारक तरतुदी आणि शासनाने ८ मार्च २०१९ च्या शासन आदेशाने त्या अटी व शर्तींची केलेली मोडतोड यासंबंधी बारकावे सांगून महाराष्ट्र शासनाने यूजीसी रेग्युलेशन यथाशीघ्र जसेच्या तसे लागू करावे असे आवाहन केले. एमफुक्टोचे सचिव व नुटाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी धरणे आंदोलनातील उपस्थित सर्व शिक्षकांसमोर धरणे आंदोलनामागील भूमिका आणि आतापर्यंत केलेल्या आंदोलनाच्या आठही टप्प्यांची माहिती दिली. महाराष्ट्र शासनातील शिक्षण सचिव आणि शिक्षण संचालक यांनी शासनाची कशाप्रकारे दिशाभूल केली आणि त्यांच्या या सर्व प्रकारांमुळे शिक्षकांना कोणकोणत्या स्तरावर नुकसान सहन करावे लागत आहे याचा संदर्भांसहित आढावा आपल्या भाषणातून मांडला. आज महाराष्ट्रातील सर्व विद्यापिठासमोर हजारो प्राध्यापक धरणे आंदोलनासाठी बसलेले आहेत. शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन महाविद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्या त्वरित मान्य कराव्यात असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी डॉ. सुभाष जाधव, डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. राजेंद्र भांडवलकर, डॉ. आशिष राऊत, डॉ. महेंद्र मेटे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

# शिवसेनेच्या प्राथमिक सदस्य नोंदणीला लोणार तालुक्यात सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक दशकापासून सर्व सामान्यांच्या प्रश्नासाठी आणि हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेना पक्षाच्या सदस्य अभियानाला घड़लेल्या राजकीय बंडानंतर ग्रामीण भागातील संघटना मजबूत करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे.

लोणार व तालुक्यातील सदस्य नोंदणीला सुरुवात करण्यात आली असून शिवसेनेच्या सदस्य नोंदणीला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. गेल्या दोन दिवसात शेकडो शिवसैनिकांनी आपला नोंदणी अर्ज भरून दिला असल्याची माहिती शिवसेनेचे संदीप मापारी, माजी नगरसेवक असलम खान, श्याम राऊत, नगरसेवक पती गजानन जाधव, कैलास अंभोरे, सूदन अंभोरे, समाधान मापारी, किसनराव मोरे यांनी दिली आहे.






# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नाचनवेल येथे रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील नाचनवेल येथे भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाले असुन या पार्श्वभूमीवर नाचनवेल ग्रामपंचायत आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कन्नड पंचायत समिती गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे व त्यांच्या पत्नी वैशाली ढोकणे यांनी रक्तदान केले.

रक्तदान करून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समाजोपयोगी माध्यमातून साजरा करण्यात आला. घाटी रुग्णालयाच्या रक्त संकलन पथकामार्फत जि.प.हायस्कूल प्रांगणामध्ये रक्तदात्यांची प्राथमिक माहिती, तपासणी करून रक्तदानासाठी पाठविण्यात आले. यावेळी कन्नड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संतोष द्वारकुंडे यांनी वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी पंचेचाळीसाव्यांदा रक्तदान केले. त्यांचा शिबिरातील सहभाग वैशिष्ट्यपूर्ण ठरला.

रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र, समाजसेवी कार्यकर्ते, पत्रकार, शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि गावातील युवा वर्गाने पुढाकार घेतला. यावेळी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, वैशाली ढोकणे, सहाय्यक गटविकास अधिकारी एस.डी.चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी बी.एस. लांजेवार, रक्तसंकलन पथकाचे हनुमान रुळे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.अंजली थोटे, सरपंच छायाबाई थोरात, नानासाहेब चव्हाण, गणेश खिल्लारे, विजय रावते, सुनीता वडगावकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी महाग्रामीण बळीराजा योजनेचा लाभ घ्यावा : मयूर सोनटक्के

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा असून या शाखेला अठरा ते वीस गावांना समाविष्ट करण्यात आले आहे. या समाविष्ट गावामध्ये देव्हारी, डाभा, घाणेगांव तांडा, नादांतांडा, नादागांव, टिटवी, मोलखेडा व सावळदबारासह हे गावे जोडले गेले आहे. या महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेकडून महाग्रामीण बळीराजा तारणहार योजना ही शेतकी बांधवासाठी सुरु करण्यात आली असून या योजनेत थकीत कर्ज नियमित करण्याची सुवर्ण संधी, मोठ्या सवलतीसह थकीत कर्जमुक्ती आणि पुन्हा नवीन कर्जासाठी पात्र म्हणजेच खऱ्या अर्थाने शेतकरी बांधवांसाठी "तारणहार योजना ही आत्मसन्मानातून अल्प व्याजदरात पुन्हा कर्ज घेऊन त्या शेतकऱ्यांना पून्हा आर्थिक मुख्य प्रवाहात आणण्याचे काम ही बँक सतत शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून करत आहे. अशा विविध प्रकारे सावळदबारा येथील या शाखेच्या माध्यमातून कर्जपुरवठा, कर्ज सवलत आदी उपाययोजना केल्या असून, आता शेतकऱ्यांवर थकबाकीदार असलेला शिक्का पुसून टाकण्यासाठी "महाग्रामीण बळीराजा" योजना आणली आहे. या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक मयूर सोनटक्के यांनी केले आहे.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने बँक कर्जदार, शेतकरी यांच्या मेळावा माजी जि.प.सदस्य शिवाजी बुढाळ, माजी सभापती धरमसिंग चव्हाण, पंचायत समिती सोयगाव, महिला सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, सरपंच भागवत जाधव, सरपंच राहुल हेलोडे, अंशु ठाकूर, शाखा व्यवस्थापक मयूर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली नसून तडजोड आहे. या "महाग्रामीण बळीराजा" योजनेत परिसरातील जवळपास २०० ते २५० कर्जदार आहेत त्यापैकी आता १०० ते १२५ कर्जदार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे आणि जे कर्जदार वंचित असतील त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत येऊन समक्ष भेटावे ही शक्तीची वसुली नसून त्यात तडजोड करून परत कर्ज देऊन शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभे करणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा मुख्य उद्देश आहे.तरी जे काही कर्जदार शेतकरी असतील त्यांनी या "महाग्रामीण बळीराजा योजनेचा" लाभ घ्यावा, असे आवाहन शाखा व्यस्थापक मयूर सोनटक्के यांनी केले आहे. याप्रसंगी बँकेचे कर्मचारी काशीनाथ वावरे, शिवा जैस्वाल, राम भडजी, पो.पा.विलास कुल्ले व शेतकरी उपस्थित होते.

# साधना पाटील ही उपक्रमशील शाळा : दिलीप सिरसाठ

## विद्यार्थ्यांना चाइल्ड हेल्थ कार्डचे मोफत वाटप; साधना पाटील विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साधना पाटील प्राथमिक विद्यालय नरसिंगपूर, कन्नड येथील शाळेत ७५ वा स्वातंत्र्य दिन मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जीवन-ज्योती हेल्थ कार्डचे मुख्य संचालक अजय खरात, प्रसंगी जि.प.उपाध्यक्ष औरंगाबाद एल.जी.गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, युवाउद्योजक मनोज पवार, भाजपाचे संजय गव्हाणे, गटविकास अधिकारी पं.स कन्नड चंद्रहार ढोकणे, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड दिलीप सिरसाठ, शिक्षण विस्तार अधिकारी कन्नड एच.डी.चव्हाण, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील, संस्थेचे सचिव टी.एस कदम, संस्थेचे उपाध्यक्ष बद्रीनाथ कतारे, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रभाकर मनगटे, संस्थेच्या संचालिका शारदा पाटील, संचालक श्याम कदम, डॉ.राधिका पाटील, साधना पाटील विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अस्मिता कदम, साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक भगवान ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ए.के चक्रवर्ती ग्रुपचे मुख्य संचालक अजय खरात यांनी त्यांच्या



जीवन-ज्योती हेल्थ कार्डच्या माध्यमातून साधना पाटील प्राथमिक विद्यालयातील वर्ग पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना चाइल्ड हेल्थ कार्ड या नावाचे मोफत विमा कवच कार्डचे वाटप करण्यात आले. जवळपास विद्यालयातील १९० विद्यार्थ्यांचा जीवन-ज्योती हेल्थ कार्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मोफत विमा कवच काढण्यात आले आणि त्या कार्डचे मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. तसेच या जीवन-ज्योती हेल्थ कार्ड विषयी मुख्य संचालक अजय खरात यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना सविस्तर माहिती दिली व त्या कार्डचे अनेक फायदे समजावून सांगितले.

जि.प उपाध्यक्ष एल.जी गायकवाड बोलताना म्हणाले की, स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना असे लक्षात येते की आपला देश अत्यंत वेगाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. कोरोना सारख्या भयानक आजाराच्या संकटात सुद्धा आपल्या देशाने उल्लेखनीय कार्य केले आहे. म्हणून आपण सर्वांनी आणखी एकजुटीने राहून आपला देश मजबूत केला पाहिजे असे ते बोलताना म्हणाले.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता कदम, शिक्षक नरेंद्र पवार, पालक विलास बनसोडे, अशोक वाहुळ, आमीन शेख, अनिल सिरसाठ, सतीश वाघ, शिक्षिका विजया कुमावत, मंजिरी कदम, प्राजक्ता तागवाले, प्रियंका घुले, शिक्षक सुनील गवारे, अमोल घुगे, सुनील मोरे, नामदेव पवार, प्रभाकर चौधरी, सुभाष आघाडे यांच्यासह पालकांची व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल घुगे तर आभार सागर पाटील यांनी मानले.

### गटशिक्षणाधिकारी यांनी केले शाळेचे कौतुक

**गटशिक्षणाधिकारी दिलीप सिरसाठ बोलताना म्हणाले की, साधना पाटील प्राथमिक विद्यालय नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते तसेच ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शाळेने विविध उपक्रम राबविल्याबद्दल आणि बालवर्गातील उदंतिका त्रिभुवन चिमुकलीने केलेल्या भाषणाचे कौतुक करत तिला बक्षीस देत म्हणाले की असेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव आणखी मोठे करा असा संदेश देऊन शाळेचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शाळेला व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिले आहेत.**

# जामठी येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जि.प.मराठी शाळेत व ग्रामसंसद जामठी तसेच जिल्हा परिषद शाळेत शिक्षक वृंद शिक्षक वृंद तसेच गावातील तरुण मंडळ व ज्येष्ठ नागरिक यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने एक कार्यक्रम" हर घर तिरंगा"हा कार्यक्रम जि.प मराठी शाळेत मोठ्या उत्साहात साजरा केला. याप्रसंगी मुख्यधापक एम.सी. पाटील व शाळेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष उमेश सरोदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तदनंतर राष्टगीताचा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उपस्थित संपन्न झाला. संपूर्ण जामठी गावामध्ये रॅली काढून या तिरंग्याचा अवमान होऊ नये म्हणून ग्रामपंचायत मार्फत प्रत्येकाच्या घरावर हर घर तिरंगा ही सर्व शिक्षक व ग्रामसेवक संदीप सावंत सरपंच वैशाली राठोड व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तंटामुक्ती अध्यक्ष महारु नाईक व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी पुढाकार घेऊन हर घर तिरंगा हा अभियान एक अनोखा पद्धतीने राबविण्यात आला होता. नागरिकांनी स्वतः जबाबदारी घेऊन 75 वा अमृत महोत्सव दिन हा अति आनंदात साजरा करण्यात आला या



कार्यक्रमाला सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल ग्रामपंचायत कार्यालयच्या वतीने सरपंच वैशाली राठोड व ग्रामसेवक संदीप सावंत व तंटामुक्ती अध्यक्ष महारु नाईक यांनी सगळ्यांचे आभार मानले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि.प.सदस्य लखुसिंग नाईक, पो.पा.घनश्याम जाधव, चेअरमन देलसिंग जाधव, तोटावर आप्पा, माजी सरपंच राधेश्याम जाधव, शिक्षकवर्ग, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी व ग्रामस्थ ध्वजारोहण कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका रेणुकादास वैद्य यांच्या संपर्क कार्यालयावर आज गजानन महाराज व्यापारी महासंघातर्फे सामूहिक राष्ट्रगीत घेण्यात आले. यावेळी जयंत देवळांकर, अनंत जयस्वाल, गंगाधर कोठारी, राजेंद्र गोलेच्या, प्रवीण सरोवर, अनंत जोशी, अमोल जोशी, चंदन राजपूत, सुराणा, राजेंद्र गोसावी, गणेश गायकवाड, राज निळ, संदीप अहिरे, गणेश कांबळे, बंटी कचकुरे, संजय गावंडे आदींची उपस्थिती होती.

# संत तुकाराम विद्यालयात विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर तसेच शालेय अंतर्गत खो-खो स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** शिंगी येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था वरुड संचलित संत तुकाराम विद्यालय शिंगी ता. गंगापूर जि. औरंगाबाद शाळेत माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्री मतदार संघाचे आमदार हरिभाऊ बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर तसेच शालेय अंतर्गत खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र सिद्धनाथ वाडगाव येथील डॉ.सना पठाण, श्रीमती मेघा मेटे, श्रीमती आशा जाधव, राजेंद्र जाधव, शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे, सुरेश चव्हाण, श्रीमती मंगल जाधव, श्रीमती कल्पना उरणकर, गजानन हरकळ, गोकुळ काकडे, संदीप सावंत, हरिभाऊ चौधरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास बनकर यांनी केले.





# मेहकर विधानसभा मतदारसंघातील आजादी गौरव यात्रेचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या सूचनेप्रमाणे मेहकर विधानसभा क्षेत्रामध्ये देऊळगाव साकरशा पासून सुरू झालेल्या ७५ किलोमीटरच्या आजादी गौरव पद यात्रेचा समारोप आज लोणार येथे संपन्न झाला.

लोणार येथील हिरडव चौकापासून पायदल यात्रा सुरू होऊन शहरातील मापारी चौक, जैन मंदिर, महाराणा प्रताप चौक ही यात्रा परिवार फंक्शन हॉल येथे पोहोचली या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मेहकर विधानसभा मतदारसंघाचे पक्ष निरीक्षक ॲड. अनंतराव वानखेडे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विजय अंभोरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर, माजी जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटीचे लक्ष्मण घुमरे, मेहकर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष देवानंद पवार, लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी, नगरपालिका अध्यक्षा पुनम पाटोळे, उपाध्यक्ष बादशाह खान, नगरपरिषद गटनेते भूषण मापारी, महाराष्ट्र प्रदेश सेवादल संघटक प्रकाश धुमाळ, भीमशक्तीचे कैलास सुखदाने, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्रा. गजानन खरात, लोणार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नितीन शिंदे, मेहकर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज हजारी, सेवा दलाचे प्रदेशचे शैलेश बाविस्कर, माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर चिभडे, माजी काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष शांतीलाल गुगलिया, माजी नगराध्यक्ष मेहकर विलास चनखोरे, एनएसयुआय जिल्हाध्यक्ष शैलेश खेडकर, अल्पसंख्यांक सेल तालुका अध्यक्ष तोफिक कुरेशी, काँग्रेस ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे, माजी उपनगराध्यक्ष शेख समद शेख अहमद उपस्थित होते.

याप्रसंगी बादशाह खान, देवानंद पवार, राजेश मापारी, विलास चनखोरे, लक्ष्मण घुमरे, अनंतराव वानखेडे, कैलास सुखदाने, श्याम उमाळकर, विजय अंभोरे यांनी मार्गदर्शन केले. प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर यांनी यावेळी काँग्रेसला वेगळे करून स्वातंत्र्याचा इतिहास सांगताच येऊ शकत नाही. काँग्रेसची आजादी आंदोलनातील भूमिका व स्वातंत्र्यानंतर देशाच्या केलेला विकास याबाबत विस्तृत माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गजानन खरात यांनी तर सूत्रसंचालन नितीन शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन शेख समद शेख अहमद यांनी केले. यावेळी लोणार नगरपालिकेचे नगरसेवक शेख रउफ, नगरसेवक शेख रमजान परसुवाले, नगरसेवक सतीश राठोड, नगरसेविका जोत्सना सरदार, युवक काँग्रेसचे भरत राठोड, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, माजी बांधकाम सभापती प्रा. सुदाम कांबळे, माजी नगरसेवक पंढरी चाटे, माजी नगरसेवक शेख अस्लम शेख कासम, माजी नगरसेवक शेख करामत शेख गुलाब, माजी नगरसेवक शंकर हेंद्रे, माजी नगरसेवक बळीराम मादनकर, काँग्रेस नेते रामचंद्र कोचर, काँग्रेसचे नेते दौलत मानकर, तोसीफ कुरेशी, पप्पू कुरेशी, संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य शेख सज्जाद, मनीष पाटोळे, शेख अजमत शेख अनामत, मीडिया सेलचे शहराध्यक्ष मोहसीन शहा, भवानी मापारी, ओम पाटोळे, शेख जुनेद करामत, लोणार नगर परिषदेचे नगरसेवक, काँग्रेस पक्षाचे आजी माजी कार्यकर्ते युवक काँग्रेस सेवादल एनएसयुआय अल्पसंख्यांक सेल चे तसेच गावातील काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लोणार : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तालुक्यातील टिटवी ग्रामपंचायत येथे ग्राम पंचायत व जिल्हा परिषद शाळेमध्ये सरपंच भगवानराव कोकाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण बक्षीस वितरण करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी ध्येयनिष्ठ व्हावे : अभिजीत धर्माधिकारी

## कण्व ब्राह्मण समाजातर्फे गुणवंत विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा कण्व ब्राह्मण समाजातर्फे 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व 5वी, 8वी, 10वी, 12 वी तसेच इतर प्रोफेशनल कोर्सेस मधील 75% पेक्षा जास्त गुण घेणाऱ्यां विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजीत करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक सदस्य डॉ अनंतराव जयपूरकर, प्रमुख पाहुणे कृष्णा एज्युझोनचे अभिजीत धर्माधिकारी व ज्येष्ठ पत्रकार भालचंद्र पिंपळवाडकर यांच्या हस्ते झाले. त्यानंतर मागील वर्षातील समाजातील सर्व दिवंगत व्यक्तींची नावे कार्याध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी वाचून त्यानंतर दोन मिनिटं मौन पाळून श्रध्दांजली वाहिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना समिती अध्यक्ष अशोक रंगनाथराव भाले यांनी विद्यार्थ्यातिल प्रत्येक गुणांसाठी स्पर्धा प्रचंड असून पारितोषक देताना ते जाणवल्याचे सांगितले. अनेक विद्यार्थ्यांनी काही विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवले. ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष सीएस लक्ष्मीकांत जयपूरकर यांनी संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती, करिअर अवेअरनेस कार्यक्रम, अभ्यासिका, संस्थेच्या पतसंस्थेद्वारे दिले जाणारे शैक्षणिक कर्ज, दरवर्षी दिला जाणारा खेल रत्न पुरस्कार आदी बाबींचा उल्लेख करत संस्था अधिकाधिक लोकाभिमुख व विद्यार्थीप्रिय होत असल्याचे सांगितले. याच कार्यक्रमात आर्थिक स्थिती कमकुवत असणाऱ्या 3 विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रतिवर्ष रु 5000/- ची शिष्यवृत्ती जाहीर करून



पहिल्या वर्षांचा धनादेश देण्यात आला.

प्रमुख पाहुणे अभिजीत धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांना वाट कितीही बिकट असली तरी ध्येयनिष्ठ होऊन कठोर परिश्रम करावेत असे नमूद केले. ध्येयाप्रति बांधिलकी ठेवावी, कमिटमेंट असणारी माणसेच समाजात यशस्वी होतात असे सांगून चांगल्या गोष्टींचा संदर्भ घ्यावा व वाईट गोष्टीला फक्त उदाहरण समजून सोडून द्यावे असे सांगितले. आपल्याला मिळालेल्या चांगल्या गुणांची संगत धैर्याशी करून आपला आत्मविश्वास केंव्हाही ढळू देऊ नका असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यात आदरभाव असावा पण केविलवानेपणा नसावा. विद्यार्थ्यांना पुढील करियरमध्ये आपल्यातील गुणवत्तेसह चारित्र्य व नीतिमत्ता सुध्दा महत्वाची आहे असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला.

धर्माधिकारी यांनी पालकांना सांगितले की, आपल्या मुलांना नुसतेच गुणवंत नव्हे तर संस्कारी/शीलवंत बनवा. वाईट सवयी लागू देऊ नका. मुलांचे लाड न करता त्यांच्यावर प्रेम करा असे सांगितले. जंक फूड खाउ घालण्यापेक्षा प्रेमाने त्याला प्रोत्साहन द्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष भालचंद्र पिंपळवाडकर यांनी विद्यार्थ्यांनी चाकोरीबध्द्ग करियर न करता काही हटके करावे, तुलना नेहमी चांगल्या व्यक्तीशी करावी व आपल्यातील कमतरता दूर करून सतत प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

15 ज्येष्ठ नागरिकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या योगदानाबद्दल सत्कार करून अभिष्टचिंतन करण्यात आले. 65 गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यात 5 वी 94% गुण घेऊन सर्वप्रथम आलेले अद्वैत शाम गीते व सेजल समीर मालखरे, 8 वी 97.7% गुण घेऊन आलेला सुखद सुमित तिजारे, 10 वी CBSE त 97.4% गुण घेऊन सर्वप्रथम वरद अजय मोहोळकर, 12 वीत 91% गुण घेऊन सर्वप्रथम आलेल्या निनाद अभिजित कुलकर्णी यांचा समावेश आहे. प्रमुख पाहुण्यांचा परिचय धनंजय सिमन्त व सविता आचार्य यांनी केला. सहसचिव दीपक खळेगावकर यांनी आभार प्रदर्शन केले. तर ज्योती महेश कुलकर्णी, संगीता कागबट्टे व उदय यांनी केले. कार्यक्रमास 300 विद्यार्थी, पालक व ज्येष्ठाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष आर.के. कुलकर्णी, सचिव पुरूषोत्तम भाले, कोषाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, जनसंपर्क प्रमुख प्रवीण शिरोडकर व अलका भाले, सुरेंद्र आनंदगावकर, नंदकुमार सोनोनी, धनंजय पांडे, राधाकृष्ण न्यायाधीश, मिलींद कुलकर्णी, सतीश तांबोळी, विजयालक्ष्मी भाले, धीरज देशपांडे, प्रफुल्ल कुलकर्णी आदींनी प्रयत्न केले.

# कलावंतांच्या पदयात्रेत देशभक्तीपर गीतांचा जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमुत महोत्सवी वर्षानिमित्त येथील म्युझिक असोसिएशन ऑफ औरंगाबाद या संघटनेच्यावतीने पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. उस्मानपुरा परिसरातील संत एकनाथ रंगमंदिर ते क्रांतीचौक या दरम्यान काढण्यात आलेल्या या पदयात्रेत जवळपास पन्नास स्त्री - पुरुष कलावंतांनी सहभाग नोंदवला. पांढरा शुभ्र पोषाखात सहभागी झालेल्या कलावंतांनी यावेळी देशभक्तीपर गाणी सादर करुन क्रांतीचौक परिसर दणाणून सोडला. सारे जहासे अच्छा, ये देश है वीर जवानो का, मेरा कर्मा तू,वंदे मातरम, मेरे देश की धरती अशी अनेक देश भक्तीपर गाणी यावेळी कलावंतांनी सादर केली. म्युझिक असोसिएशन ऑफ औरंगाबाद संघटनेचे प्रभारी अध्यक्ष अध्यक्ष रवींद्र प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल हिवाळे, संजय हिवराळे, जीवन कुलकर्णी, महेंद्र नरवाडे, विजय सोनवणे, कलीम पटेल, विशाखा रुपल, राजेंद्र वैराळ, स्टॅलिन सेलार या आणि इतर कलावंतांनी या पदयात्रेसाठी परिश्रम घेतले. शीतल रुद्रवार हिने पदयात्रेमागची भूमिका मांडली तर प्रिया नरवाडे यांनी आभार मानले.






# काकनवाडा खुर्द येथील ग्रामपंचायत व गावकऱ्यांकडून गुणीजनांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** काकनवाडा खुर्द तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा येथील ग्रामपंचायत तथा गावकऱ्यांकडून शिक्षक भिमराव परघरमोल, तलाठी कांबळे, ग्रामसेवक राजू बोडखे, अशा सेविका सोनिका नांदने यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात काकणवाडा खुर्द येथील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, ग्रामसंघ, वारकरी संप्रदाय, तथा गावकरी यांच्या वतीने तीन दिवसीय कार्यक्रमांची रेलचेल करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून १५ ऑगस्ट २०२२ रोजी ध्वजारोहणानंतर ग्रामसभा घेऊन त्यामध्ये गुणीजनांचा सन्मान करण्यात आला. कोरोना काळातील लोकाभिमुख कामगिरी, शैक्षणिक कार्य, वैचारिक जागृती करणारे लेखन तथा व्याख्यान यांची दखल घेऊन नाशिक येथे राष्ट्रीय कृतज्ञता पुरस्कार मिळाला म्हणून भिमराव परघरमोल, महसुली कार्य सर्वोत्कृष्ट पार पाडले म्हणून जिल्ह्यातून ५१८ तलाठ्यांमधून झालेल्या निवडीची दखल घेत तलाठी कंबळे, शासनाच्या सर्व योजना ग्रामपंचायत मार्फत गावकऱ्यांपर्यंत उत्कृष्ट रितीने पोहोचल्या म्हणून तालुक्यातून निवड झालेले ग्रामसेवक राजू बोडखे तर कोरोना लसीकरणाबद्दल गावातील जागृती व लक्ष पूर्ण केले म्हणून अशा सेविका सोनिका नांदने यांचा प्रमाणपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन गावचे सरपंच गोपाल अढाव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी मंचकावर भिलावेकर साहेब सहाय्यक गटविकास अधिकारी संग्रामपूर, उपसरपंच शेळके, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्या आशाताई अढाव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा लक्ष्मीताई अढाव, तलाठी कांबळे, सविताबाई अढाव, मंदाताई अढाव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भिमराव परघरमोल यांनी तर प्रास्ताविक राजू बोडखे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोपान कुरवाडे, सोपान आढाव यांनी प्रयत्न केले तर कार्यक्रमाला गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# शनैश्वर सोशल ग्रुपतर्फे जिल्हा परिषद शाळेतील 150 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**मक्रणपूर :** १५ ऑगस्ट अमृत महोत्सव दिनानिमित्त शनेश्वर क्रिकेट सोशल ग्रुपतर्फे मक्रणपूर येथील जिल्हा परिषद शाळेत 150 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपून ज्या शाळेत आपण शिकलो तेथे आपल काही देणे लागतो या उद्देशाने तेथील माजी विद्यार्थी यांनी हा उपक्रम यशस्वी केला. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात पुढे जाण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळेल. ग्रुपतर्फे केलेल्या या कार्याचे शाळे तर्फे खूप आभार व्यक्त करण्यात आले.

या उपक्रमासाठी सर्व शनेश्वर क्रिकेट ग्रुप व सर्व मित्रमंडळी यांनि परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित मुख्याध्यापक मधुकर पवार, सर्व शिक्षक वर्ग, ग्रामस्थ मंडळी, पालक वर्ग उपस्थित होते. सर्वांनी शनेश्वर सोशल ग्रुपचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुणाल सोनवणे यांचे व सर्व ग्रुपचे शाल, हार, श्रीफळ देऊन शाळेतील शिक्षकांनी स्वागत केले.



# लिंकवर क्लिक करताच खात्यातून १ लाख ५४ हजार ९९४ रु. लंपास

## ऑनलाइन फसवणूक करणाऱ्याविरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुक्यातील राजना येथील रहिवासी असलेल्या युवकाने लिंकला क्लिक करताच एका युवकाच्या बँक खात्यातून १ लाख ५४ हजार ९९४ रुपये ऑनलाइन तोतयांनी उडविल्याचे खळबळजनक घटना घडली आहे. राजेंद्र नामदेव राठोड (वय २८, रा. राजना ता. पुसद जि. यवतमाळ) असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे. या युवकाच्या तक्रारीवरून पुसद ग्रामीण पोलिसांनी तोतयाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राजेंद्र नामदेव राठोड याचे भारतीय स्टेट बँक इंडिया शाखा पुसद येथे खाते आहे. दि.१० ऑगस्ट २०२२ रोजीच्या सायंकाळी ५:०० वाजल्याच्या सुमारास डियर कस्टमर युअर युनो अकाउंट हॅजबीन सस्पेंडेड ओर डे प्लीज अपडेट युवर पॅन कार्ड नंबर थँक यु एसबीआय असा मेसेज त्याला आला होता. त्या मेसेजखाली एक लिंक सुद्धा आली होता. त्यानंतर या लिंकवर क्लिक केले असता राजेंद्रच्या खात्यातून पहिले ९९ हजार ९९८.६ रूपये व नंतर २४ हजार ९९५.८ रूपये त्या पाठोपाठ ३० हजार रुपये असे एकुण १ लाख ५४ हजार ९९३ रूपये अशाप्रकारे खात्यातील रक्कम ही परस्पर अज्ञात व्यक्तीने काढुन घेतल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. ही बाब लक्षात येताच राजेंद्रने लगेच एसबीआयकडे टोल फ्री क्रमांकावर तक्रार केली. तक्रारीत रक्कम आपोआप कपात झाल्याबाबत फोनव्दारे माहिती दिली. त्यानंतर दि.११ ऑगस्ट २०२२ रोजी भारतीय स्टे बँक शाखा पुसद येथे घडलेल्या प्रकाराबाबत तक्रार अर्ज दिला. तक्रारीत लिंकव्दारे राजेंद्रला मोबाईलवर मॅसेजव्दारे लिंक पाठवुन त्याच्या खात्यातील रक्कम परवानगी शिवाय अज्ञात व्यक्तीने परस्पर काढुन घेतलेली आहे. त्याची सखोल चौकशी करून संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व खात्यातील परस्पर काढलेली रक्कम मिळवुन द्यावी अशी मागणी तक्रार कर्त्यांनी केली या प्रकरणी अधिक तपास ग्रामीण पोलीसांनी सुरू केला आहे.

# सावळदबारा येथे ग्रा. पं. कार्यालयासह विविध ठिकाणी ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील ग्रामपंचायत कार्यालयात तसेच विविध ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतमध्ये प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील व उपसरपंच मो. आरिफ मो. लुखमान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर जि. प. मराठी शाळेत मुख्यधापक एम. डी. सोनेने व शाळेय समितीचे अध्यक्ष तडवी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले व जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेत नामदेव चव्हाण व रत्नाकर हुबंरे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र ग्रामीण बँकेत व्यास्थापक मयूर सोनटक्के हस्ते ध्वजारोहण झाले, शिवाजी विद्यालयात प्राचार्य पंजाबराव कोलते (पाटील) यांच्या ध्वजारोहण करण्यात आले. तर ३३ केव्ही महावितरण उपकेंद्र सहाय्यक अभियंता योगेश जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. पोलीस चौकी मिरखाँ तडवी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर नँशनल मराठी शाळेत मुख्यधापक मनोज चोपडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात केंदाचे कर्मचारी, सोपान मानकर व मो.तालिब मो.छब्बीर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.




अशा प्रकारे विविध ठिकाणी ध्वजारोहणचा कार्यक्रम गावात संपन्न झाला.स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सव सन साजरा करताना सावळदबारा येथील पूर्ण ग्रामस्थ तसेच गावातील तरुण मंडळ व ज्येष्ठ नागरिक यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने हर घर तिरंगा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करून तीन दिवस ग्रामपंचायतच्या वतीने गावातून विद्यार्थ्यांची प्रभातफेरी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हातात तिरंगा ध्वज देऊन जनजागृती करण्यात आली होती. "आजादी का अमृत महोत्सव" मोठ्या आनंदात प्रत्येक घरा घरात साजरा करण्यात आला. संपूर्ण गावामध्ये रेली काढण्यात आली. अशी रॅली काढून या तिरंग्याचा अवमान होऊ नये म्हणून ग्रामपंचायत मार्फत नागरिकांना सूचना देण्यात काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले होते. प्रत्येकाच्या घरावर हर घर तिरंगा ही बाब सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक सुधीर भालेराव, सरपंच, उपसरपंच यांनी पुढाकार घेऊन हर घर तिरंगा हा अभियान एक अनोखा पद्धतीने स्वतः जबाबदारी घेऊन 75 वा "आजादी का अमृत महोत्सव" दिन हा अति आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते प्रा. जीवन कोलते यांनी सगळ्यांचे आभार मानले. यावेळी गावातील कर्मचारी, पत्रकार बंन्धू, वनपरिक्षेत्राचे कर्मचारी, वि.वि.सेवा सोसायटीचे कर्मचारी व चेअरमन,व्हाय चेअरमन व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संस्कृत ही समृद्ध आणि सर्वव्यापक भाषा

## डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे प्रतिपादन



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** संस्कृत भाषा ही जगातील समृद्ध अशी भाषा आहे, आपल्या दैनंदिन जीवनात आपण असंख्य असे संस्कृत शब्द उपयोगात आणत असतो. आपल्यापैकी अनेकांची नावे संस्कृत असतात. त्यांचे व्युत्पत्त्यर्थ कसे करणे शक्य आहे. या संदर्भात यास्काचार्यांच्या निरुक्तामध्ये वर्णन आहे. असे प्रतिपादन डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांनी केले. आदर्श शिक्षण शास्त्र महाविद्यालय, पुणे येथे नुकताच संस्कृत दिन कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सोनपेठकर शास्त्री बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. डॉ. मोहन कांबळे सर होते. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. विश्वासराव, प्रा. आमले, प्रा. जोशी, प्रा. भंडारे, प्रा. रॉय, प्रा. वराडे, प्रा. गंधे आदि प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. सुरश्री रहाळकर, सखी कुलकर्णी, मानसी गोळे या विद्यार्थिनींनी मेघदूत या महाकवी कालिदासविरचित खंडकाव्याचे उत्कृष्ट अभिवाचन या प्रसंगी सादर केले.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त माजी सैनिकाच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्सवात साजरा होत असताना तालुक्यातील वढव येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने देशाची सेवा करून सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक अनिल भाऊराव काकड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कृतज्ञता व्यक्त केली.

हिंदुस्तानच्या स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव देशभरात उत्साहात साजरा करीत असताना श्री शिवाजी शिक्षण संस्था लोणार द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वढव यांनी यांच्या शाळेमधून 2001 मध्ये एस.एस.सी. चे शिक्षण पूर्ण करून बावीस मार्च 2002 ला सैन्यात भरती झालेले अनिल भाऊराव काकड यांनी अठरा वर्ष रणगाडा चालक म्हणून देश सेवा केली. त्यांनी त्यांची सुरुवात झाँसी येथून तर सेवानिवृत्ती जम्मू-काश्मीर मधून पूर्ण केले. हे या शाळेचे माजी विद्यार्थी आणि माजी सैनिक असून यांच्या हस्ते 15 ऑगस्ट चे ध्वजारोहण करण्याची संकल्पना संस्थेचे अध्यक्ष डॉ.के.बी. मापारी, सचिव प्रकाशराव मापारी व संचालक डॉ. अनिल मापारी यांनी सुचवून त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी शाळेने प्रभात फेरीचे आयोजन करून ट्रॅक्टर मध्ये भारत माता व बाजूला चार बंदुकधारी विद्यार्थी सैनिक म्हणुन उभे करून गावात फेरी मारली पाच सहा दिवसापासून शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करून अमृत महोत्सव साजरा केला. यासाठी मुख्याध्यापक सुनील पाटोळे व सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. यावेळी माजी सैनिक अनिल भाऊराव काकडे यांचा व गावातील प्रतिष्ठित मंडळींचा सत्कार करण्यात आला.



# क्रांतिकारकांचे स्वप्न साकार व्हावे : पुसदकर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दि. 15 ऑगस्ट 2022 रोजी ज्येष्ठ नागरिक मंडळ धंतोली तर्फे आयोजित व्याख्यानमालेमध्ये प्रमुख वक्ता म्हणून बोलताना अमोल पुसदकर म्हणाले की आमचा इतिहास हा सतत संघर्षाचा इतिहास राहिलेला आहे. आमच्या देशातील जनता ही स्वातंत्र्य प्रेमीच होती. त्यामुळे विविध प्रकारच्या मुस्लिम आक्रमकांच्याद्वारे करण्यात आलेले आक्रमण आम्ही परतावून लावले. व वेळोवेळी देश स्वतंत्र केला. इंग्रज भारतात आल्यानंतरसुद्धा अवघ्या चाळीस वर्षांमध्ये 1857 चा स्वातंत्र्यसंग्राम झाला. त्यानंतरच्या 90 वर्षांच्या कालावधीमध्ये सुद्धा भारतीय जनता सातत्याने इंग्रजांशी झगडत होती. हा देश आपण आपल्या हातात टिकवू शकणार नाही असे इंग्रजांना जेव्हा वाटले तेव्हा त्यांनी देश सोडण्याचा निर्णय घेतला आणि जनतेच्या दबावा खातर त्यांना आम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागले. हे स्वातंत्र्य आम्ही मिळविलेले स्वातंत्र्य आहे. दानात मिळालेले स्वातंत्र्य नाही. यासाठी ज्यांनी बलिदान केले त्या क्रांतिकारकांचे स्वप्न साकार करण्यासाठी कठोर परिश्रमांची आवश्यकता आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत खरे यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वरंभे हे उपस्थित होते. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गणमान्य नागरिक उपस्थित होते.




# तलवारीच्या धाकावर ट्रक चालकास लुटणारे दोघे गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** १५ ऑगस्ट रोजी पोलीस स्टेशन पैठण हद्दीमध्ये रात्रीचे साडेबारा वाजेच्या सुमारास कर्नाटक राज्यातून कोपरगाव व नाशिक येथे माल वाहतुक करणारा ट्रक एका बोलेरो वाहनातील दोन इसमांनी रहाटगाव फाटा येथे आडवुन चालक व वाहकाला तलवारीचा धाक दाखवुन त्यांना चापटबुक्क्याने लाथाने मारहाण करुन त्यांच्याकडील रोख १४०० रुपये जबरीने काढून घेतल्याची घटना राजगस्तीवर असलेले पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक पवार व स्टाफला मिळताच त्यांनी सदर संशयीत वाहनाचा शोध घेतला आणि सदर वाहन आढळुन आल्यानंतर जोखीम पत्कारुन वाहनाचा पाठलाग करुन बोलेरो वाहन क्रमांक एम.एच.१६ सी.वाय. ५१७७ मधील दोन इसम सोमनाथ दादासाहेब नरवडे वय २० वर्ष, रा. घोटण, ता. शेवगाव, जि. अहमदनगर, स्वप्नील मारोती दराडे, वय १९ वर्ष, रा. पागोरी पिपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन १८०० रुपये रोख, विविध कंपन्याचे तीन महागडे मोबाईल, घातक शस्त्र तलवार, एक फोल्डींगाचा रामपुरी चाकु असे वाहनासह एकुण ०६,४६,८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून अशा प्रकारे एकुण ०२ आरोपीतांना अटक केलेले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अपर पोलीस अधीक्षक पवन बन्सोड, औरंगाबाद ग्रामिण उपविभागीय पोलीस अधिकारी पैठण डॉ. विशाल नेहल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सफो संजय मदने, पोहेकॉ कल्याण ढाकणे, दिनेश दांडगे, पोलीस नाईक नरेंद्र अंधारे, कृष्णा दुबाले, अंकुश शिंदे, होमगार्ड नवरडे आदी यांनी केली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)




डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

यावरील उपचारांमध्ये गॅमा स्कॅब, BB LOTION यामुळे माईट्स व त्याची अंडी मरतात. हे लोशन मानेपासून खाली पूर्ण शरीराला लावून ८ ते १४ तासांनंतर धुवावे. तसेच प्रतिजैविके (ANTIBIOTICS) तीन आठवड्यांपर्यंत घ्यावीत. कपडे ड्राय क्लीन करणे, बेडशीट्स गरम पाण्यातून काढणे असे उपचार आणि उपाय करता येतात.

**प्रसार :** याचा प्रसार हा स्कॅबीज असणाऱ्या सोबत सेक्युअल कॉन्टॅक्ट आल्यामुळे होतो.

**प्रतिबंध :** कंडोम वापरुन याचा प्रतिबंध होत नाही. त्यामुळे सेक्स न करता राहणे (जे शक्य नाही) किंवा एकाच पार्टनरसोबत आयुष्यभर राहणे ज्याला इन्फेक्शन वा कोणताही आजार नाही.

**शंकरॉईड (SHANCHROID) :** हा आजार बॅक्टेरिया (जीवाणू) मुळे होतो. यामध्ये अतिशय त्रासदायक अशा जखमा अवयवांवर होतात. स्त्रियांमध्ये हा आजर दिसत नाही. पुरुषांमध्ये लिंगावर जखम होऊन खरबडीत उंचवटे असलेल्या जखमा तयार होतात. जर यावर वेळीच उपचार केले नाहीत तर भोवतालच्या पेशी मृत होतात.

**निदान आणि उपचार :** बायोप्सी ऑफ अल्सर या चाचणीच्या माध्यमातून या आजाराचे निदान केले जाते. उपचारांमध्ये प्रतिजैविक (ANTIBIOTICS) त्यांचा वापर, जखमांचे क्लिनिंग आणि डिब्राईडमेंट करणे असे उपचार केले जातात.

**प्रतिबंध :** हा आजार सहसा प्रॉस्टिट्यूट्स म्हणजेच वेश्यांमध्ये आढळतो. यावर प्रतिबंध म्हणून कंडोम वापरणे, डेंटल डॅम वापरणे अशा गोष्टी करता येतात. हा आजार स्कीन टू स्कीन कॉन्टॅक्टने वाढतो त्यामुळे याची दक्षता घेणे फार महत्त्वाचे आहे.

**एच.आय.व्ही. एड्स म्हणजे काय?**

एच.आय.व्ही. चा लाँग फॉर्म आहे, ह्यूमन इम्युनो डेफिशिवन्सी व्हायरस आणि एड्सचा लॉगफॉर्म आहे, ॲक्वायर्ड इम्युनो डेफिशियन्सी सींड्रोम. हा आजार रक्त आणि फ्लुईड्स यांच्यामुळे पसरतो. उदा. लाळ, व्हजायनल सिक्रिशन्स यांच्यामुळे बऱ्याचदा असं होतं की सुरुवातीला याची लक्षणं दिसतच नाहीत. एच.आय.व्ही. झालेली व्यक्ती बरीच वर्षे काहीही लक्षणे न दाखवता राहतात. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com